शनिवार । १५ जून १९७४
एक रुपया

# माणूस

## उत्पादकांचाच संप....

...पण रेल्वे कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या सरकारने ठोकरून लावल्या. वाटाघाटींऐवजी अटकसत्र अवलंबून रेल्वे कर्मचाऱ्यांवर संप लादला. तो संप मोडून काढण्यासाठी सामदंडादी सारे उपाय सरकारने हाताळले.

आज पाळी वनस्पती उत्पादकांची आहे. त्यांनी पुकारलेल्या आंदोलनाविरुद्धही सरकार त्याच जिद्दीनं, त्याच कणखरपणानं उभं राहतं का तेच आता पाहायचं आहे.

तसं उभं राहून काळाबाजार, स्मगलिंग, भेसळ या विरुद्ध सरकारनं युद्धपातळीवर आघाडी उघडली तरच या जिद्दीला खरा अर्थ येईल.

रेल्वे कामगारांविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या इंदिरा सरकारला हे अवघड वाटू नये.


काळे कापड
काळ्या निशाणांसाठी
वापरायला बंदी घातली
पाहिजे. पांढऱ्या कापडाच्या
छत्र्या वापरायला
लाज वाटते
आपल्याला


अणुस्फोटामुळे झालेले
विवर नाही. लाचलुचपतीच्या
वाढत्या दरामुळे महागडी
झालेली दोन लाखाची
विहीर आहे साहेब!


गध्या नापास झाला आहेस. तू पाहिलास तो एस्. एस्. सी.चा निकाल नव्हता. लॉटरीचा होता!


मी प्रामाणिक समाजसेवक आहे. त्याचा पुरावा म्हणून लाच देणाऱ्या साऱ्या हितचिंतकांची नावेच सादर करतो!
श्याम जोशी


सौंदर्याचा अणुबॉंब
तुम्हालाच म्हणतात ना ?
हो !
चाचणी
घ्यायचा विचार
आहे की काय ?


सरकारी नोकरांना
काही महिने
पगारवाढ देणार
नाही !
अन् उरलेले
महिने पगार
देणार नाही
असच ना ?

## डालडा उत्पादन थंडावले :

# उत्पादकांचाच संप !

**सु. ल. सोमण**

देशातले उत्पादनाचे कारखाने परवापासून बद झाले आहेत. गेल्याच आठवड्यात शासनाने, रेशनवर अधिक डालडा देण्याची घोषणा केली होती. खुल्या बाजारातही तो मिळू लागणार होता रेल्वे सपाच्या ऐन धामधुमीत, शासनाने ह्या बातम्या प्रसृत केल्या. त्याच सुमारास दिल्लीत केंद्र सरकार आणि वनस्पती (डालडा, उमदा, पकाव वगैरे) उत्पादक ह्याची लट्ठालट्ठी सुरू होती. उत्पादकाना डालड्याचे भाव वाढवून पाहिजे होते. भुईमुगाच्या तेलाच्या भावात भरमसाठ वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढला होता. सरकारने भाव वाढवून दिल्याखेरीज, हा वाढत्या खर्चाचा बोजा आपल्याला सहन करता येणार नाही ही भूमिका उत्पादकानी घेतली होती. मागितलेली भाववाढ थोडी थोडकी नव्हती. किलोमागे अडीच रुपये. सध्याचा सरकारने उत्पादकाना बाधून दिलेला भाव आठ रुपये आहे. किरकोळीत, (काळचा बाजारात नव्हे !) तो साडेदहा-अकराच्या आतबाहेर पडतो. ह्यावर अडीच रुपये भाववाढ मजूर करायची म्हणजे गिऱ्हाईकाच्या हातात डालडा पडेपर्यंत त्याची किंमत साडेतेरा-चौदाच्या घरात जाईल. काळचा बाजाराची अर्थातच त्यावर दोन-चार रुपये. म्हणजे गेल्या दिवाळीच्या सुमारास डालडा अदृश्य होऊन, त्याचे साठे बाहेर काढले जाऊन जो भाव साडेसहा-सात रुपयाच्या आतबाहेर घोटाळत होता. तो आज थेट चौदा पधराच्या घरात जाऊ पाहात आहे. भयानक महागाई, दुर्भिक्ष्य ह्यामुळे आधीच सरकारवर जनता चिडलेली आहे. सप, बद, ठिकठिकाणचे उठाव ह्यातून जनतेची चीड वरचेवर दिसून येत आहे. अशावेळी, आधीच भडकलेल्या डालडाच्या किंमती अडीच रुपयानी वाढवून द्यायला सरकार राजी झाल तर ते असतोषाला आमत्रण ठरेल. वनस्पती उत्पादकांना किंमती वाढवून देण्याबाबत सरकार नकार देत आहे त्याच हेच कारण आहे.

रेल्वेकर्मचाऱ्याच्या मागण्या न्याय्य होत्या. काँग्रेसचे जे वेतनविषयक ठराव अलिकडे पसार झाले, आहेत, त्यानीही हेच सिद्ध केल आहे. पण रेल्वे कर्मचाऱ्याच्या न्याय्य मागण्या सरकारने ठोकरून लावल्या. वाटाघाटीऐवजी, अटकसत्र आरभून रेल्वे कर्मचाऱ्यावर सप लादला. तो सप मोडून काढण्यासाठी सामदडादी सारे उपाय सरकारने हाताळले. आज पाळी वनस्पती उत्पादकाची आहे. त्यांच्या मते, उत्पादकाच्या मागण्या न्याय्य आहेत. सरकार आडमुठेपणाने त्या ठोकरून लावीत आहे. साहाजिकच ट्रेड युनियन्सप्रमाणेच विचार करून, वनस्पती उत्पादक सघाने आपल्या सदस्याना आज उत्पादन स्थगितीचा आदेश दिला आहे. एकपरी, उत्पादकानी आज, सरकारी निर्णयाच्या विरोधात सपच पुकारलेला आहे. ह्याच उत्पादकाच्या कपन्यातून कामगार सप पुकारतात आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी तो सप ह्या उत्पादकाना मान्य नसतो सरकारही उत्पादनाच्या नावाखाली कारखानदाराच्या बाजूने उभे राहाते. पण आज खुद्द उत्पादकानीच सप पुकारलेला आहे सरकारी धोरणाविरुद्ध ! रेल्वे कामगाराविरुद्ध सरकार ठामपण उभे राहिले. बहुसख्य कारखानदारानीही त्यावेळी सरकारला साथ दिली. आज पाळी त्याचीच आहे आणि सरकार त्याच्याविरुद्ध आहे किती ठाम धोरण ह्यावेळी अवलबते ते पाहावे लागेल. कामगाराना ज्या कठोरपणे वागवले, तीच कठोरता उत्पादकाच्या आगळ्या संपाच्या वेळीही सरकार दाखवते का ते पाहिले पाहिजे ! मागे नॅफ्थाचे भाव सरकारने एकाएकी वाढविले होते. त्यावेळी मुबईच्या नोसिल आदी कपन्यानी उत्पादन बद करायची धमकी दिली होती. आणि धमकीचा परिणाम असेल कदाचित, पण जेमतेम पधरावीस दिवसातच सरकारने नॅफ्थाचे भाव थेट बावीसशे रुपयावरून हजारावर आणून ठेवले ! वनस्पती उत्पादकाच्या बाबतीत, आज सरकारचे धोरण ताठर वाटत आहे. पण शेवटी नाड्या ह्याच लोकाच्या हातात असल्याने धोरणातला हा ताठरपणा, कितपण टिकतो ते पाहावे लागेल.

कामगाराच्या मागण्या नाकारून त्याच्या सपांना विरोध करणाऱ्या उत्पादकानीच आज सपाच्या मार्गांचा अवलब केला आहे. देश नाजूक अवस्थेत असताना उत्पादनाला खीळ घातली आहे. कामगाराना वेळोवेळी डोझ पाजणाऱ्यानीच हे केले असल्याने, वरील ऊहापोह करावा लागला. त्या ऊहापोहानुसार, सरकारने ताठर धोरण स्वीकारून उत्पादकाच्या मागण्या धुडकावून लावल्या तर, काही गटात त्याचे कदाचित स्वागतही होईल. 'कामगारानाच नाही तर, पैसेवाल्या उत्पादकानाही आम्ही तसेच वागवतो' अशी स्वत ची पाठ सरकारला थोपटून घेता येईल. पण ह्याने मूळ प्रश्न सुटणार नाही. जनतेला डालडा मुबलक प्रमाणात उपलब्ध होणार नाही. दडपशाहीचा बडगा उभारून सरकार रेल्वे कर्मचाऱ्याना, असतुष्ट अवस्थेत का होईना, पण परत कामाला जुपू शकले. उत्पादकाच्या बाबतीत अशी जबरदस्ती सरकारला करता येईल

असे वाटत नाही. 'कारखाना तोटयात चालतो तसा तो मला चालवायचा नाही. त्यापेक्षा बंद ठेवणे मी पत्करीन.' ही उत्पादकाची भूमिका आहे साहाजिकच आहे. गेल्या १५-२० वर्षांत त्याने गुंतवणूक, तीवरील व्याज व शिवाय नफा हे सारे पुरेपूर वसूल केले आहे. त्यामुळे कारखाना बंद राहाणे त्याच्या दृष्टीने तोटयाचे मुळीच नाही. It is just a loss in profit नफ्याला तो मुकेल एवढेच. उलट तोटयात राहून धंदा करणे म्हणजे, 'पदराला खार लावून' घेणे आहे. तेव्हा त्याला जबरदस्ती करून, 'तोटयात असलास तरी धंदा चालव' ('तुझा पगार तुला पुरत नसला तरी, मुकाटयाने काम कर' ह्या धर्तीवर!) असे सांगून उत्पादन सुरू करणे जवळ जवळ अशक्य आहे. वनस्पती उत्पादनाचे कारखाने सरकारने ताब्यात घेऊन चालविणे हा दुसरा उपाय. पण सरकारला ते शक्य होईलसे वाटत नाही. तेव्हा निव्वळ ताठर धोरण स्वीकारून हा प्रश्न सुटेल असे वाटत नाही. त्यासाठी ह्या प्रश्नावर अधिक चिंतन-मनन झाले पाहिजे!

विरोधी राजकीय पक्षाची ह्या प्रश्नावर साचेबंद मते तयार झाली आहेत. 'अन्नधान्य (त्यात डालडाही आले!) लोकांना पुरवण्याची जबाबदारी सरकारची आहे. पुरेशा प्रमाणात व वाजवी दरात, लोकांच्या खिशांना परवडेल अशा पद्धतीने ते कसे पुरवायचे तो शासनाचा प्रश्न आहे.... अन्नधान्याच्या व्यापाराचे-उत्पादनाचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण हा त्यावर तोडगा आहे.... सरकारला हे जमत नसेल तर सरकारने राजीनामा देऊन बाहेर पडावे.... पण जोपर्यंत सरकार ह्या दोन्हीपैकी काहीही करीत नाही, आणि लोकांना पुरेसे धान्य वाजवी दरात मिळत नाही, तोपर्यंत जनतेचा लढा चालू ठेवण्याचे काम आमचे आहे....' डाव्या पक्षाची साधारण भूमिका अशी आहे. स्वतंत्रवाद्यांना नियंत्रणे पूर्णपणे उठवली जावीत असे वाटते. "नियंत्रणामुळे आज सगळा खेळखंडोबा झाला आहे. नियंत्रणामुळे काळाबाजार फोफावला आहे. चोरटी आयात-निर्यात वाढली आहे.... चलन फुगवटा झाला आहे.... नियंत्रणे काढून टाका, अर्थशास्त्राच्या नियमानुसार, मागणीप्रमाणे उत्पादन वाढेल. शेतकऱ्यांना भाव चांगला मिळेल. त्यातून उत्पादन वाढेल. उत्पादन वाढले की आपसूक किंमती स्थिरावतील. रुपया स्थिरावेल...." हा, असा खाक्या स्वतंत्राचा आहे. बहुसंख्य कारखानदार, उद्योगपती, बुद्धिजीवी मंडळींचाही हा सूर आहे. जनसंघीय नक्की कुठे आहेत ते समजत नाही. नियंत्रणे नकोत, एकाधिकार खरेदी नको; पण सुनियंत्रित वाटप-पद्धती हवी असा काहीसा सूर त्यांचा असतो. काँग्रेसवाले त्यांच्याच धुंदीत असतात. असे प्रश्न आहेत हेच त्यांना मनापासून पटते की नाही कोण जाणे. '...महागाई वाढली आहे, हे मान्य. पण ती एकूण जागतिक परिस्थितीमुळे वाढली आहे. विरोधक उगाचच त्याचा फायदा उचलून जनतेला भडकावतात.... त्यामुळे परिस्थिती आणखीनच चिघळते. प्रश्न बिकट होतात....' हा असला काँग्रेसी खाक्या!

वनस्पती उत्पादक आणि सरकार ह्यांच्यातल्या झगडयाच्या बातम्या बारीक-सारीक प्रमाणात येऊ लागल्या, तेव्हाच पुढील वादळाची अंधुक कल्पना आली. वनस्पती मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनी दिल्लीत मंत्र्यांबरोबरची बोलणी फिस्कटल्याचे जाहीर करताच ह्या कल्पनेला पुष्टी मिळाली. तेव्हाच मी मुंबईतल्या राजकीय पक्षांच्या छावण्यातून डोकावलो. पण त्यावेळी रेल्वे संपाची पडछाया बहुतेक सर्व छावण्यातून पडलेली होती. गेल्या वर्षीच्या महिलांच्या डालडा विरोधी आघाडीतल्या दोन प्रमुख नेत्या आ. श्रीमती मृणाल गोरे व कॉ. अहिल्याबाई रांगणेकर अटकेत होत्या. समाजवादी पक्ष निम्मा अटकेतच होता. इतर होते, ते जॉर्जच्या स्वागताच्या तयारीत गढले होते. मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या, जनसंघीयांच्या छावण्यातूनही हीच अवस्था थोडयाफार फरकाने होती. डांगे गट आपल्या कोलांटी उडीच्या समर्थनार्थ धडपडत होता. रेल्वे संप मोडीत काढल्याच्या आनंदात काँग्रेसवाले होते. थोडक्यात, रेल्वे संपाच्या कवित्वापुढे वनस्पती उत्पादक विरूद्ध केंद्र सरकार ह्या झगडयाकडे लक्ष द्यायला फारसा कुणाला वेळ नव्हता. तशाही अवस्थेत जी काही प्रतिक्रिया आढळली, ती, साधारणतः वरीलप्रमाणे होती. जनसंघ व डाव्या पक्षांनी, किंमती वाढल्यास त्याविरूद्ध आंदोलन उभारण्याची भाषा बोलून दाखवली.

'...किंमती परवडत नाहीत ही निव्वळ बकवास आहे. ह्यां लोकांना अधिक फायदा हवा आहे ही वस्तुस्थिती आहे. निवडणुका, रेल्वे संप वगैरेंच्या वेळी भांडवलदार, कारखानदार, काँग्रेसच्या पाठीशी उभे राहातात. पाण्यासारखा पैसा ओततात. तो कुठेतरी ते वसूल करणारच. सरकारही आज खळखळ करीत आहे. थोडा विरोधाचा आव आणून जनमत चुचकारायचा प्रयत्न करीत आहे. पण ते सारे फसवे आहे. मुळात सरकारी पक्ष, सरकार, त्यांची यंत्रणा हे सारे ह्या भांडवलदारांशी बांधलेले आहेत. गव्हाच्या बाबतीत, सुरुवातीला असाच घोटाळा ठेवून सरकारने भाव वाढवून दिले. डालडाचेही तेच होणार, सध्या चालू आहे तो निव्वळ फार्स आहे...' सीटू (डावे कम्यु.)चे श्री. सावंत, एकूण प्रश्नावरील प्रतिक्रीया व्यक्त करताना म्हणाले.

जनसंघाचे श्री. धारपुरे ह्यांना ह्या प्रश्नावर सखोल अभ्यास व्हावा असे वाटते. भुईमुगाला अमेरिकेत महत्त्वपूर्ण स्थान आहे. पूर्वी शेती म्हणजे कापूस, गहू हेच अमेरिकेत महत्त्वाचे उत्पादन असे. पण जॉर्ज वॉशिंग्टन टी. ब्रूकर ह्यांनी क्रांतिकारक प्रयोग केले. नवनवीन प्रयोग स्वतःच्या प्रयोगशाळेत फुलवले. आणि भुईमुगाला अमेरिकेत महत्त्वपूर्ण स्थान मिळवून दिले. भुईमुगाची टरफलेसुद्धा तिथे वाया जाऊ दिली जात नाहीत. भुईमुगाचे हरप्रयत्नांनी पीक अफाट वाढवले आहे, आणि खाद्यपदार्थ, तेले, साबण, तंतू, रेझीन्स असे अनेक उद्योग त्यावर आज सुरू आहेत. गोरे अमेरिकन्स चांगल्या जमिनी बळकावून कापूस, गहू वगैरेंच्या उत्पादनावर गबर होत होते. निग्रोंना नापीक जमिनींच्या तुकडयावर राबराबूनही काही मिळत नसे अशा अवस्थेत टी. ब्रूकर ह्यांनी भुईमुगाचे वरदान निग्रोंना मिळवून दिले. ते आज लक्षाधीश बनले आहेत.... ह्या मोठया फायद्याखेरीज भुईमूग उत्पादनाचा दुसरा एक फायदा झाला. भुईमुगामुळे जमिनीची धूप भरून निघू लागली. गोऱ्या अमेरिकनांनी देखील मग भुईमुगाचे आडसाली पीक घ्यायला सुरुवात केली.... आजच्या वनस्पतीच्या भाववाढीवर विचार करताना इतक्या खोलवर जाऊन विचार करायची गरज आहे. केवळ उत्पादकांना, विक्रेत्यांना नफेबाजीबद्दल झोडपून काढून प्रश्न सुटणार नाहीत. साठे दडवले

जातात, काळाबाजार होतो हे निर्विवाद. ते साठे बाहेर काढून कुठे तात्पुरता रिलीफ कुणाला मिळूनही जातो. जनजागृती व सरकारवर दबाव ह्या दृष्टीने अशी आंदोलने होणे आवश्यक आहे. भुईमुगाच्या तेलाच्या किमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यामुळे डालडाच्या किमतीवर परिणाम व्हावा हे उघड आहे. तरीही बॅलन्सशीट्स् बनवायच्या पद्धती, फॉर्वर्ड ट्रेडिंग, वनस्पतीऐवजी मटन टॅलो आदिंची उत्पादने वगैरेतून उत्पादक प्रचड नफे मिळवू शकतात ह्या प्रकारानाही सार्वजनिकरित्या तोड फोडणे आवश्यक आहे. पण हे सारे करूनही मूळ प्रश्न तडीस लागत नाही. भुईमुगाच्या उत्पादनवाढीशिवाय तो प्रश्न तडीस लागणारच नाही. आणि त्यासाठी खोलात शिरून ह्या प्रश्नाला हात घालणे आज आवश्यक आहे....'

हे प्रतिपादन एका दृष्टीने खरेही आहे. त्याबाबत दुमत असायचे कारण नाही. किंवहुना अन्नधान्य विषयक प्रत्येक बाबतीत ते लागू पडेल. खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्या की गदारोळ उठतो. आंदोलने छेडली जातात. सरकार आदोलने निपटून काढते. काहीतरी आश्वासने देते. आणि तिथेच प्रश्न सपतो, त्यापुढे काही नाही. पुन्हा आपले येरे माझ्या मागल्या नवीन किमती पचनी पडतात हरित क्रांतीच्या फुका वल्गना उठतात. उत्पादन प्रत्यक्षात घटतेच. नव्या भाववाढीच्या हालचाली सुरू होतात चक्र असे फिरत राहाते ह्याच गुन्हाळातून उत्पादन वाढीच्या मूळ प्रश्नाला कुठे हातच घातला जात नाही. रेल्वे सपात तो सपवताना सरकारने मूलभूत प्रश्न सोडवले नाहीतच. उलट कामगाराना असतुष्ट ठेवले. रेल्वेतल्या आधीच्याच अकार्यक्षमतेला आणखी खतपाणी पुरवले. वनस्पती उत्पादकाच्या सपातही अशीच ताठर भूमिका सरकारने स्वीकारली आणि मूळ प्रश्नाला हात लावला नाही, तर ह्याच प्रकार पुन्हा घडेल. लोकाच्या ह्या महत्त्वाच्या खाद्यान्नाचा प्रश्न अधिक बिकट होऊन बसेल.

ह्या मूलभूत प्रश्न सोडवायला अर्थात बराच काळ लोटावा लागेल. आजच्या घडीला म्हणूनच, एकूण प्रश्नाचा विचार करून वास्तव भूमिका घेणे आवश्यक ठरेल. त्यातली राजकीय गुतागुत थोडी बाजूला ठेवून, प्रश्न प्रतिष्ठेचा न बनविता, वनस्पती बाबत जर हे सूत्र शोधण्यात यश आले, तर इतरत्रही त्याचा वापर करता येईल. जुजबी उपाय शोधून उत्पादनाला बसलेली खीळ दूर सारता येईल. नतर शात वातावरणात, मूळ प्रश्नाला हात घालता येईल. ह्यासाठी आज पहिली निकड आहे ती, ह्या प्रश्नाशी निगडीत असलेल्या विविध गटाच्या भूमिका समजावून घेण्याची.

वनस्पती उत्पादक सघ हा ह्यातला अर्थातच प्रभुख घटक. ह्या संघाचे सेक्रेटरी डॉ. छत्रपती हे ह्या धद्यातले अधिकारी अर्थज्ञ. त्यांना त्याच्या ऑफिसात मी गाठले. उत्पादकाची भूमिका समजायला ही भेट फार महत्त्वाची ठरली. एकेकाळी वनस्पती धद्यात उत्तम फायदा होता हे त्यानी मोकळपणाने मान्य केले. पण १९६७ मध्ये वनस्पतीचे भाव सरकारने नियत्रित करायला सुरुवात केली आणि हे चित्र पालटले. ह्याचे महत्त्वाचे कारण हे की, वनस्पतीचे भाव सरकार नियत्रित करू लागले, पण ज्या भुईमुगाच्या तेलावर हा धदा सर्वस्वी अवलबून आहे त्या तेलाच्या भावांवर मात्र कुठेही नियत्रण नाही. एकूण तेलोत्पादनच्या वीस टक्केच उत्पादन ह्या धद्यात येत असल्याने,

### भुईमूग तेल आणि वनस्पतींचे भाव

| वर्ष | भुईमुगाच्या तेलाचे भाव रुपये–टन | वनस्पतीचे भाव रुपये–टन |
|---|---|---|
| १९६८–६९ | ३०१३ ते ५४५० | ४२५० ते ४७५० |
| १९६९–७० | ३२७५ ते ५५७५ | ४७५० ते ४८०० |
| १९७०–७१ | ३८५० ते ५५०० | ४८०० |

| | तेल | वनस्पती | तेल | वनस्पती | तेल | वनस्पती |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९७१–७२ | १९७२–७३ | | १९७१–७२ | १९७२–७३ | |
| नोव्हेंबर | ३७५० | ४८६० | ५४०० | ५६५५ | ६५५० | ७६४० |
| डिसेंबर | ३९०० | ४८६० | ५२६० | ५६५५ | ६६०० | ७४४० |
| जाने. | ३९७० | ४८६० | ६५५० | ६०५५ | ७५५० | ७४४० |
| फेब्रु. | ३९२० | ४८६० | ६२५० | ६०५५ | ८००० | ८००० |
| मार्च | ३८८० | ४८६० | ६२०० | ६०५५ | ८१२५ | ८००० |
| एप्रिल | ३७३० | ४८६० | ६९५० | ६०५५ | ८२५० | ८००० |
| मे | ३६८० | ४७६० | ७२५० | ६८५० | ९००० | ८००० |
| जून | ४१२५ | ४९६० | ८००० | ७५५५ | ... | ... |
| जुलै | ४३७५ | ४९६० | ९२०० | ७५५५ | ... | ... |
| ऑगस्ट | ४३०० | ५१५५ | उ. ना. | ७५५५ | ... | ... |
| सप्टेंबर | ४७५० | ५३५५ | ८०५० | ७५५५ | ... | ... |
| ऑक्टोबर | ४८५० | ५५५५ | ७७५५ | ७५५५ | ... | ... |

वनस्पती उत्पादक, तेलाचे भाव नियत्रित करू शकतील हेही शक्य नव्हते. परिणामतः तेलाच्या किमती–उत्पादन एकूण गरजेपेक्षा खूपच कमी असल्याने–वाढत गेल्या. वनस्पती उत्पादनाचा खर्च वाढत गेला. स्थानिक तेलाच्या किमती वाढत असतानाही, आयातीचा फायदा घेऊन वनस्पतीच्या किमती स्थिर राखणे जमत होते. पण गेल्या नोव्हेंबर पासून ही आयातही कमी होत गेली. फेब्रुवारी पासून तर ती नाहीच. अर्थात स्वस्त अशा आयात तेलाचा कारखान्याना पुरवठाच नाही. अशा अवस्थेत निव्वळ स्थानिक तेलावर धद्याला अवलबून राहावे लागते. वनस्पती धद्याच्या एकूण खर्चापैकी ९० टक्के खर्च तेलावर होतो. त्यांच्या किमती जर आठ ते नऊ हजार रुपये टनांवर असल्या तर, वनस्पतीचे आजच्या भावात, म्हणजे सव्वासात रुपयाच्या दरात उत्पादन करणे कसे परवडेल ? स्वत च्या खिशाला ही कात्री उत्पादकांनी का लावून घ्यावी ?

ह्या खेरीज, रिझर्व बँकाच्या नियमानी, ह्या धद्याला आणखीन कात्रीत पकडलेले आहे. एकूण किमतीच्या केवळ २५% च पैसा बँकाकडून आज धद्याला मिळतो आहे. ७५% पैसा स्वत.च्या गगाजळीतून उभा करावा लागतो. साहाजिकच तेलाचे साठे करून ठेवायसाठी, आज उत्पादकाना पूर्वीच्या दुप्पट, चौपट भाडवल ओतावे लागते, पूर्वी दोन दोन महिन्यांच्या उत्पादनासाठी पुरेल एवढे साठे ठेवले जात. आज वरील कारणामुळे जेमतेम ८–१५ दिवसाचे साठे ठेवणं उत्पादकांना शक्य होते. तेलाच्या किमतीतल्या

पृष्ठ २२ वर

# ऊेक वैशिष्टयपूर्ण ब्रॅक !


आमची वॅक ही एक वैशिष्टयपूर्ण बॅक आहे ती विकास वॅक म्हणून कार्य करते.)
समाजातील सर्व घटकाच्या संतुलित विकासासाठी ती प्रयत्नशील आहे.

| | |
|---|---|
| भाडवल व निधी | : रु २५ कोटी |
| अेकूण ठेवी | : रु. १२८ कोटी |
| अेकूण कर्जे | · रु १६५ कोटी |
| खेळते भाडवल | : रु. २३२ कोटी |

शाखा : मुंबईत २५ आणि नागपुरात ६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बॅंक लि.

९, बेकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१



# सोलकढी

## □ पंधरा-सोळा हेच वार्धक्याचे वय

शाळेत माझे फार हाल झाले. उग्र शिक्षक, शिस्तखोर पालक, अवघड अभ्यासक्रम आणि सुमार समज यापैकी एकानेसुद्धा विद्यार्थ्यांची यथास्थित दुर्दशा होऊ शकते. मी तर चारही गोष्टींनी घेरला गेलो होतो. त्यामुळे शाळेची वर्षे प्रत्येकी वीसबावीस महिन्याची असली पाहिजेत, असा माझा पक्का समज होऊन बसला आहे. बऱ्याच महान व्यक्तीचे शालेय जीवन खडतर असते. पण तरीही त्या आपल्या खडतर लहानपणाच्या पाळण्यात मोठे पाय दाखवून जातात. आम्ही पाळण्यात असे पदप्रदर्शन केलेले नाही. त्यामुळे मोठे होण्याची जबाबदारी आमच्यावर कधी पडली नाही. एरवी ती जबाबदारी पार पाडण्यासाठी आम्ही काय वाटेल ते खचित केले असते, असा विश्वास इतरानाच नव्हे तर आम्हाला सुद्धा वाटतो. असो.

काही पाल्याचे शाळेत म्हणे काव्यात्मक हाल होतात. शाळेच्या बध्थड भिंतीमध्ये त्याच्या मनाचा कोंडमारा होतो : शाळेतल्या बाकावर बसल्याबसल्या दिसणाऱ्या आकाशाच्या तुकड्याकडे पाहताना त्याना निळ्या अनताचा वेध लागतो; गणिताच्या रुक्ष आकड्यावरून त्यांचे मन उडते आणि फुलपाखरू होऊन निसर्गाची हिरवी, पिवळी, लाल, निळी, शुभ्र, जाभळी गाणी गुणगुणू लागते; बाहेर पावसाची मोकळी सर कोसळते आणि त्याना मास्तर ढगासारखा दिसू लागतो. मग हे निळे अनत, फुलपाखरे, ढग प्रगतीपुस्तकात मुक्कामाला येतात. सुदैवाने माझे असे काही हाल झाले नाहीत. आमचे हाल रोखठोक होते. त्यामुळे आमची मने फारशी जायबदी झाली नाहीत. मला वाटते, आमच्या काळात शाळकरी मुलाना 'मानस'च नव्हते; त्यामुळे 'मानसशास्त्रा 'ची–' बालमानसशास्त्रा 'ची भानगड उपस्थित झाली नव्हती.

अलीकडे मोठीच प्रगती झाली आहे. शिक्षणशास्त्रात मुलांच्या मनांचा विचार केला जाऊ लागला. त्यामुळे आमच्या व आमच्या आधीच्या पिढ्यानपिढ्यानी चित्रविचित्र शिक्षाचा जो आनद भोगला त्याला ही अलिकडची व पलिकडची मुले कायमची मुकली आहेत. मात्र आमच्या काळात नसलेल्या एका नव्या शिक्षेला त्याला तोड द्यावे लागते आहे : आजकाल मुलाचे आईबाप त्याच्याकडे फारच लक्ष देतात. शिस्तखोरी आणि दुर्लक्ष याचा एक कठीण तोल आमच्या पालकानी साभाळला होता. आत्ताचे पालक मुलांना घडवण्याच्या कारस्थानात सक्रीय सामील होतात आणि त्याचे (मानस) शास्त्रशुद्ध हालहाल करतात.

हे माझेच मत परवा एका ब्रिटिश आरोग्याधिकाऱ्याने आक्रोशून माडले. त्याच्या मते, मुलांनी अभ्यास करावा, नव्या नव्या गोष्टी शिकाव्या, जास्त जास्त गुण मिळवावे, पहिला क्रमांक मिळवावा आणि तो जन्मात सोडू नये, यासाठी आईबापे त्याच्या मागे लागतात; परावलबी मुले नाईलाजाने आपल्या कुवतीपलीकडे धडपडत राहतात आणि अकाली वयस्क होतात ! पुन्हा आईबापे नेहमी मुलाच्याच हिताचा विचार करतात असे नाही. कित्येकदा ते आपली आधीअधुरी महत्त्वाकाक्षा मुलाकरवी पुरी करण्याचा प्रयत्न करतात. शिवाय स्पर्धेच्या वातावरणात स्वत ला सपूर्ण झोकून देणाऱ्या आईबापाना त्याच्या मुलानी वरचे क्रमाक मिळवणे अत्यावश्यक असते.

या सगळ्यामुळे होते असे की पधराव्या वर्षीच वार्धक्याला प्रारंभ होतो. दहाबारा वर्षांची हजारो मुले निद्रानाशासारख्या बुढापी रोगाने पछाडलेली असतात. कित्येक मुलाना क्षोभशामक आणि गुंगी आणणारी औषधे घ्यावी लागतात. वाढण्यावाचून गत्यतर नसल्यामुळे वाढतात; पण त्याची मने अकाली ठिसूळ होतात. अशा परिस्थितीत मानसिक विकृती आणि गुन्हेगारी वाढीला लागणे केवळ अपरिहार्य आहे.

यावर काही उपाय नाही काय, असा प्रश्न माझ्या आणि तुमच्या मनात एकदम आला बघा. माझ्या मते उपाय नाही अशी समस्या दुनियेत नाही प्रत्येक समस्या आपल्यावरचा एखादा हुकुमी उपाय निर्माण करून मग समस्या होऊन राहते, असा माझा अनुभविक सिद्धान्त आहे. असलेला उपाय वेळेआधी, वेळेवर, वेळ निघून गेल्यानतर सापडावा लागतो एवढेच. असो. उपरिनिर्दिष्ट समस्येवर एक साधा उपाय असा आहे की मुलाना शिकायचे तसं आणि शिकायचे तेवढेच शिकू द्यावे. परमेश्वराने निर्मिलेली सगळी फुले कोठे एकसारखी एक असतात. मग परमेश्वराने निर्मिलेली सगळी मुले आपापल्या वर्गात नेहमी पहिलाच क्रमांक मिळवतील, यासाठी आपण कशाला आटापिटा करायचा ?

वास्तविक, आजची शाळूमुले उद्याचे पालक आहेत; आणि आजचे पालक कालची शाळूमुले होती. त्यामुळे शाळेत मुलाचे काय हाल होतात हे कोणाला एखाद्या ब्रिटिश आरोग्याधिकाऱ्याने किंवा अनतरावाने सागायची गरज नाही. पण आपण मुले असताना जे शिकतो ते आईबापे झाल्यावर विसरतो, त्याला कोण काय करणार !

**–अनंतराव**

# अरब-इस्रायल संघर्षात टप्प्याटप्प्याने तडजोड

वा. दा. रानडे

'प्रदेशाचा एक तुकडा देऊन शांततेचा एक तुकडा घ्यावयाचा पण प्रत्येक टप्प्याला अरबांच्या उद्देशाची चाचणी करावयाची असे आपले धोरण राहील' अशा शब्दात इस्राइलचे नवे पंतप्रधान थिटझाक रबिन यानी अरब-इस्राइल संघर्षाबाबत आपल्या सरकारची भूमिका स्पष्ट केली.

सीरियाशी युद्धतहकुबीचा नि फौजा काढून घेण्याचा करार झाल्यानंतर पंतप्रधान रबिन यानी दिलेली ही मुलाखत इस्राइलच्या धोरणातील बदलाची निदर्शक आहे सर्व वादग्रस्त प्रश्नावर एकाच वेळी सर्वंकष तडजोड किंवा करार न होता टप्प्या टप्प्याने या संघर्षातील एकेक वादग्रस्त प्रश्न मिटविण्याचे प्रयत्न होणार असे दिसत आहे गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरातील अरब-इस्राइल युद्ध थांबल्यानंतर तीन महिन्यानी सुएझ आघाडीवरून फौजा काढून घेण्याबाबत इजिप्त व इस्राइल याच्यात २० जानेवारी १९७४ ला करार झाला. सिरियाशीही करार करण्याचे त्यावेळी प्रयत्न झाले पण ते यशस्वी झाले नाहीत. पण गोलन टेकड्या आघाडीवर करार होण्याची वाट न पाहता इजिप्तचे अध्यक्ष सादत यानी इस्राइलशी करार केला. युद्धाच्या सुरुवातीस असलेली अरबाची एकजूट पुढे टिकली नाही. तेलाच्या शस्त्राचा अरबानी परिणामकारक वापर केला. त्यामुळे पश्चिम युरोपातील राष्ट्रे, जपान यानी तर अरबाना अनुकूल धोरण स्वीकारलेच पण अरबाच्या तेलावर फारसे अवलंबून नसलेल्या अमेरिकेनेही आपल्या धोरणात बदल केला. इजिप्तचे अध्यक्ष सादत रशियाकडून अमेरिकेकडे झुकले व अमेरिकेशी त्यानी मैत्रीचे संबंध जोडले. आपण मागितलेली शस्त्रे रशियाने देण्याचे नाकारल्याने रशियाशी संबंध बिघडले असे कारण सादत यानी सांगितले. याच कारणावरून या दोन देशातील संबंध बिघडण्याचा हा दुसरा प्रसंग. दोन वर्षापूर्वी इजिप्तमधील आपले सर्व लष्करी सल्लागार रशियाला काढून घ्यावे लागले. इजिप्तशी संबंध बिघडणे हा पश्चिम आशियातील रशियाच्या प्रभावाला मोठा हादरा आहे. आता इराक, सिरिया, लिबिया यांना मदत करून या भागात आपले वजन काही प्रमाणात तरी टिकविण्याचा प्रयत्न रशिया करीत आहे

फौजा काढून घेण्याबाबत सीरिया व इस्राइलमध्ये झालेल्या कराराने सीरियाचा बाह्यत फायदा झालेला दिसला तरी आपल्या मूळ मागण्याच्या मानाने सीरियाच्या पदरात फारसे काही पडलेले नाही. गोलन टेकड्या प्रांताची राजधानी कुनेचा शहराचा मुलकी कारभार या कराराने सीरियाकडे सोपविण्यात आला आहे. पण शहर पूर्णपणे सीरियाला देण्यात आले नसून यूनो दलाच्या नियंत्रणाखाली असलेल्या तटस्थ पट्ट्यात त्याचा समावेश करण्यात आला आहे हे शहर १९६७ च्या युद्धात इस्राइलने जिंकले होते ते त्याला सोडावे लागले एवढ्याच दृष्टीने सीरियाचा हा विजय म्हणता येईल. सत्तर हजार सीरियन निर्वासिताना या शहरात परतण्याचा हक्क देण्यात आला आहे. पण इस्राइलने हे शहर मोठ्या प्रमाणात उध्वस्त केले असून सीरियन निर्वासित परतले तरी त्याच्यावर या उजाड शहरात राहण्याचा प्रसंग येणार आहे त्याच्या पुनर्वसनाचा मोठा प्रश्न सीरियाला सोडवावा लागणार आहे. ऑक्टोबर १९७३ च्या युद्धात गोलन टेकड्याच्या भागातील काही टापू सीरियाने जिंकला पण इस्राइलच्या चढाईपुढे नंतर तो सोडावा लागला. इस्राइलचे ६५ कैदी फक्त सीरियाच्या ताब्यात राहिले, निश्चित वेळापत्रक आखून इस्राइलने आपल्या फौजा पूर्णपणे काढून घेतल्या पाहिजेत ही सीरियाची मागणी मान्य झाल्याशिवाय आपण इस्राइलचे कैदी परत करणार नाही ही सीरियाची मूळ भूमिका पण अखेर सीरियन कैद्याच्या बदली इस्राइली कैदी परत करण्यास त्यास तयार व्हावे लागले. मौंट हर्मनवरील दोन ठाणी इस्राइलने युद्धात जिंकली. ती यूनो दलाच्या नियंत्रणाखाली देण्याची तयारी इस्राइलने दर्शविली होती पण ही ठाणी सीरियालाच मिळाली पाहिजेत अशी सीरियाची मागणी होती. ती मान्य झालेली नाही. करारानुसार ती यूनो दलाच्या नियंत्रणाखाली जात आहेत. कुनेतशहर इस्राइलला सोडावे लागले तरी त्याच्याजवळच्या तीन टेकड्या इस्राइलच्याच ताब्यात राहणार आहेत. आघाडीच्या भागातील इस्राइलीच्या दोन वसाहतीही यूनोच्या तटस्थ पट्ट्याबाहेर राहाणार आहेत.

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री डॉ. किसिंजर याच्या मध्यस्तीने ३१ दिवस या वाटाघाटी चालू होत्या. व अखेर त्यात त्याना यश आले. इस्रायलच्या सुरक्षिततेची हमी आम्ही देऊ पण इस्रायलने बळकावलेला अरबाचा प्रदेशही त्याच्याकडे राहिला पाहिजे अशी हमी आम्ही देऊ शकत नाही. इस्राइलला हा भाग सोडावाच लागेल असे या वाटाघाटीत डॉ. किसिंजर यानी स्पष्ट केले होते. अरबाचा बळकावलेला प्रदेश आपण आपल्या ताब्यात कायमचा ठेवू शकत नाही याची इस्राइलच्या नेत्यानाही कल्पना होती पण सुरक्षित सीमाची हमी मिळेपर्यंत हा प्रदेश सोडण्याची त्याची तयारी नव्हती अमेरिकेने तसे आश्वासन दिले आहे. याचा अर्थ अरबाचा बळकावलेला सर्व प्रदेश इस्राइल एकदम सोडून देईल असे नाही पण टप्प्याटप्प्याने एकेक प्रदेश ते सोडतील.

इजिप्त व सीरियाशी करार झाल्याने अरब-इस्राइल संघर्ष मिटलेला नाही. फक्त युद्ध थांबून तो आता वाटाघाटीच्या टेबलावर लढविला जाईल. वाटाघाटी रेंगाळतील पण इस्राइलवरील अमेरिकेचे दडपण आणि इजिप्त व सौदीअरेबियाशी तिने जोडलेले मैत्रीचे संबंध लक्षात घेता अखेर हा प्रश्न राजकीय तडजोडीने मिटेल व जिंकलेल्या प्रदेशापैकी बराच भाग इस्राइलला सोडणे भाग पडेल. अमेरिका व रशिया या दोन्ही बड्या राष्ट्राना पश्चिम आशियात पुन्हा नवे युद्ध नको आहे.

अनिर्णित प्रश्नामध्ये पॅलेस्टिनिअन अरब निर्वासितांचा प्रश्न महत्त्वाचा आहे. तो समाधानकारक सुटल्याशिवाय अरब-इस्राइल संघर्ष खऱ्या अर्थाने मिटणार नाही. पॅलेस्टिनिअन अरबाचे राज्य स्थापण्याची सूचना काही महिन्यापूर्वी अमेरिका व रशियाने केली गाझा, जॉर्डन नदीचा पश्चिम किनारा आणि जेरुसलेमचा अरब विभाग याचा या राज्यात समावेश असावा असे सुचविण्यात आले आहे. इस्राइलने या योजनेस विरोध दर्शविला आहेच पण अरब राष्ट्रातही या योजनेवर मतभेद आहेत. पण रशिया अमेरिकेच्या दडपणाने अखेर ही योजना अरब राष्ट्राना मान्य करावी लागेल व इस्राइलही या तडजोडीस तयार होईल. ☐



# ऑनर डी बाल्झॅक

सौ. सुमती देवस्थळे

काही काही माणसांचे प्राक्तन इतके यातनामय असते, की उभ्या आयुष्यात सुखाची मंदशी झुळूकही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. अनेक प्रकारची दुःखे, कष्ट, अवहेलना, मनस्ताप हे सारे सोसण्यासाठीच जणू त्यांचा जन्म असतो. ऑनर डी बाल्झॅक् या फ्रेंच साहित्यिकाचा जीवितपट पहात असता वरील विधानाची सतत प्रचीती आल्याने मन गलबलून जाते. एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धातला हा श्रेष्ठ साहित्यिक. सर्व युरोपीय भाषांत त्याचे साहित्य भाषांतरित झालेले ! त्याचे साहित्य इतके प्रभावी होते की एमिल् झोलासारख्या पट्टीच्या कादंबरीकारानेही बाल्झॅकला गुरुस्थानी मानले–बाल्झॅकपासून स्फूर्ती घेतली. अवघ्या ५० वर्षांच्या आयुष्यात त्याने अपरंपार लिखाण केले, खूप कीर्ती मिळविली. तथापि नियतीने त्याला कधी सुखाचा वाराही लागू दिला नाही.

बाल्झॅक्चा जन्म १७९९ सालचा. आईवडिलांचा हा पहिलाच मुलगा. वास्तविक किती लाडाकोडात वाढायला हवा होता! पण नाही! आईने त्याच्यावर कधीही माया केली नाही. कारण तो दिसायला अगदी कुरूप, बेढब असा होता. तशात आणखी देवीचे वण. असल्या अर्बूज दिसणाऱ्या मुलाची आईला खूप लाज वाटायची. तिने त्याला कधी आपले स्तन्य दिले नाही, की प्रेमाने अंगावरून हात फिरविला नाही. वयाच्या अवघ्या चौथ्या वर्षी त्याला वेगळ्या कुटुंबात बोर्डर म्हणून ठेवण्यात आले.–सातव्या वर्षी बोर्डिंग स्कूलमध्ये रवानगी झाली. सुटीत देखील ती त्याला घरी येऊ देत नसे. आपणच केव्हातरी जाऊन भेटून येई. आईचा पहिला मुलगा असून, घरची सुस्थिती असून, या पोराच्या नशिबी असे पोरकेपण आले. मोठेपणी आईचा कधी विषय निघाला, की तो म्हणे–' मला आई नाहीये हो!' आईच्या निष्प्रेम वागण्याने त्याच्या कोवळ्या मनावर कायमचे ओरखाडे उठले होते.

त्या काळातली बोर्डिंग स्कूल्स अत्यत कडक शिस्तीबद्दल प्रसिद्धच होती. मुलाना करडी, प्रेमशून्य वागणूक मिळे. जोडीला क्रूर शिक्षेचा खुराकही असायचा. कमालीचा सवेदनाशील असा हा मुलगा शिक्षकांना मात्र अगदी मद, दिवास्वप्नात रमणारा, चक्रम् असा वाटत असे. त्यापायी त्याच्या कोवळ्या पाठीवर चाबकाचे खूप फटकारे बसत. सर्वत्र निर्दय, निरानद वातावरण होते. त्यात दिलासा एकच होता–आणि तो म्हणजे वाचनाची गोडी. लवकरच ऑनर बाल्झकला शिस्तीचा अन् माराचा धसका बसला आणि वयाच्या १४ व्या वर्षी तो शाळा सोडून घरी निघून आला. प्रदीर्घ यातनामय अनुभवातून आलेला ऑनर घरच्या निष्प्रेम वातावरणात अवाक् झाला–मूक बनला. तथापि त्याचे घुसमटलेले अस्तित्व आईला सहन झाले नाही. तिने त्याला मॅट्रीकच्या परीक्षेस बसण्यासाठी पॅरीसला धाडून दिले. तो पास झाल्याबरोबर त्याला कायदा शिकण्याचा घरून आग्रह झाला. त्याने विद्यापीठात नाव घातले. तथापि आईवडिलाना पैसे धाडणे अवघड वाटत होते. ऑनरने स्वत.च उच्च शिक्षण अर्थार्जन करून घ्यावे असे त्याचे मत होते. ऑनरला वकिलाच्या ऑफिसात नोकरी करूनच पुढील शिक्षण घ्यावे लागले–कमाईस सुरुवात झाली.

गाडी रुळाला लागलेली दिसत होती खरी! पण बाल्झॅकचे मन हे सतत उचबळणारे कलावताचे होते. वकिलाघरची ती रुक्ष कारकुनी त्याला इतकी नकोशी वाटली की असल्या वकिली कारवाया करीत जन्म घालविण्याची कल्पना तर त्याला असह्यच झाली. त्याचे मन बड करून उठले. काय वाटेल ,ते झाले तरी आपण वकील व्हायचेच नाही हे त्याने पक्के ठरवून टाकले. मग व्यवसाय कोणता करायचा? लेखनाचा बिन भाडवली व्यवसाय ऑनरला फार श्रेयस्कर वाटला. हा त्याचा निर्णय कळताच आईवडिलावर जणू वज्राघातच झाला. त्यांना वाटले, चागल्या मार्गाला लागलेल्या मुलाला अशी का अवदसा आठवली? अन् लेखन ह्याला जमायचे तरी कसे? आजवर त्याने कधी हौसेने निबध लिहिला नव्हता, की चार ओळीची कविता रचली नव्हती. तेव्हा लेखनाचा व्यवसाय करणे हा निखालस मूर्खपणा आहे झालं!

आपणास लिखाणावर पैसे मिळायला लागेपर्यंत वडिलांनी पैसे पाठवावेत अशी बाल्झॅकची मागणी होती. वडिलांनी आईच्या सल्ल्यावरून त्याला अत्यंत कमी–कमीत कमी पैसे धाडायला सुरुवात केली. गरिबीमुळे हा एकाडा पडेल, लवकर ताळ्यावर येऊन इमानाने चाकरमान्या होईल अशी त्यांची अपेक्षा. पण बाल्झॅक मात्र जिद्दीने लेखन करू लागला. चागल्या शैलीसाठी अभ्यास करू लागला. लवकरच त्याने 'क्रॉम्वेल' ही शोकातिका लिहिली. त्या नाटकाचे बाल्झॅकने निमत्रितांच्या उपस्थितीत वाचन करावे, आणि श्रोत्याच्या प्रतिक्रिया आजमावून आपल्या निर्णयाचा फेर विचार करावा असे ठरले. त्याप्रमाणे बाल्झॅकने निमत्रिताच्या उपस्थितीत नाट्यवाचन केलेही. श्रोत्यावर काही फारसा प्रभाव पडला नाही. एक अनुभवी निवृत्त प्राध्यापक तर म्हणाले, "मी ऑनरला निराश नाही करीत, पण एकदरीत पाहता, त्याने असल्या उद्योगात वेळ घालवू नये हेच उत्तम!"

पण बाल्झॅकला लेखनाचे पिसेच जडले होते. नोकरी कधीही करायची नाही हे ठरलेले होते. म्हणून त्याने नाउमेद न होता लेखनातच प्रविण्य मिळविण्याचे ठरविले. लोकाना कादंबऱ्या वाचायला जास्त आवडतात हे लक्षात घेऊन कादबरी लेखनाकडे मोर्चा वळविला. दोन ऐतिहासिक कादबऱ्या लिहिल्या. त्यात यश आले नाही. असले अपयशाचे तडाखे बसूनही आपला मुलगा ताळ्यावर येत नाही, इमाने, इतबारे कारकुनी पत्करीत नाही याची आईवडिलाना खत वाटत असे. त्यानी पैसे धाडायचे बद करण्याची धमकी दिली. म्हणून अर्थार्जन करण्याची निकड लागली. मग भराभर लहान लहान कादबऱ्या तो लिहू लागला. प्रत्येकी ८०० ते १२०० फ्रँक्सपर्यंत कमाई होत असे. उच्च अभिरुचीचा त्या धावत्या लिखाणाशी काहीही सबध नव्हता. स्वत.च्या नावावर लिखाण प्रसिद्ध करण्याची लाज वाटू लागली म्हणून प्रारंभीच्या कादबऱ्या त्याने टोपण नावाने प्रसिद्ध केल्या.

प्रेम आणि कीर्ती या बाल्झॅकच्या कर्तृत्वाच्या मुख्य प्रेरणा होत्या. त्यासाठी आयुष्यभर तो धावत होता–त्याला प्रेम हवे होते...प्रेयसी हवी होती... माता हवी होती. स्वभावतः सकोची असणाऱ्या बाल्झॅकची वयाच्या तेविसाव्या वर्षी मदाम डी बर्नी या शेजारणीशी घनिष्ट मैत्री झाली. या बाई ४५ वर्षांच्या होत्या. नऊ मुले पदरात होती–तरीही बाल्झॅक या वत्सल प्रेयसीच्या प्रेमात गुंतून पडला. ती प्रेयसी होती, त्यापेक्षाही वात्सल्याची ऊब देणारी माता होती असे म्हटल्यास अधिक बरोबर होईल. प्रेम, ऋजुता, सवेदनाशीलता, करुणा, सभाषण चातुर्य, रसिकता या सर्व गुणाची बाल्झॅकला फार गरज होती. तिने त्याच्यातला पुरुष जागा केला. साहित्याला प्रेरणा दिली, अडीअडचणीला निरपेक्षपणे मदतही केली. मुख्य म्हणजे आईसारखे प्रेम केले. त्या प्रेमाच्या अभावी त्याच्या बालपणाचे रुक्ष वाळवट झालेले होते. मायेसाठी हापापलेल्या जिवाला मदामचा आधार श्रेयस्कर वाटला. लवकरच या चमत्कारिक प्रकरणाची चर्चा सुरू झाली. बाल्झॅकची आई व मदामची मुले अस्वस्थ! तरीही ही मैत्री जवळ जवळ दहा वर्षे टिकून होती. या मैत्रीचा बाल्झॅकच्या जीवनावर विलक्षण प्रभाव होता. इतका, की पुढील आयुष्यात बाल्झॅकला तरुण मुलीचे कधीही आकर्षण वाटलेच नाही. आईची जागा भरून काढणाऱ्या पोक्त, अनुभवी स्त्रियानाच त्याच्या आयुष्यात स्थान मिळत गेले.

बाल्झॅकला पैशाची टचाई नेहमीच भासत असे कादबऱ्यातून अपेक्षेनुसार पैसा मिळत नव्हता. पण प्रकाशक मात्र भरपूर श्रीमत झाल्याचे दिसत होते. मग कल्पनेच्या राज्यात वावरणाऱ्या बाल्झॅकला प्रकाशन व्यवसाय करण्याचा मोह झाला. अभिजात साहित्यकृतीची स्वस्त आवृत्ती देण्याची त्याने योजना काढली. सामान्य कागद व बारीक टाईपात उत्तम ललितकृती छापवून घेतल्या. तथापी त्या पुस्तकाचे स्वरूप इतके अनाकर्षक होते, की प्रती खपेनात. उलट १५,००० फ्रँक्सचे कर्ज मात्र डोक्यावर बसले. मग प्रकाशनाचे हे त्रागडे एकदर कठीण आहे असे ओळखून त्याने छापखानाच चालवायचा बेत केला. एकदर व्यवहारशून्यतेमुळे हा बेतही अयशस्वी झाला. कपनीचे दिवाळे निघेपर्यंत वेळ आली. म्हणजे २९ वर्षाच्या वयाला बाल्झॅकची कमाई काय तर एक लाखाचे कर्ज ! साहित्यिक बनण्याचे स्वप्न दहा वर्षे उराशी बाळगल्याचे फलित हे इतके विदारक होते !

आता बाल्झॅकच्या प्रत्येक कृतीचा हेतू एकच ठरून गेला. सावकाराचो तोडे चुकविणे ! लिखाणाचा परिपाठ सोडणे शक्यच नव्हते. पण लिखाण उजळ माथ्याने करता येईना. बेलिफानी जप्ती आणू नये म्हणून तो एका ओळखीच्या घरात बेकायदा पोटभाडेकरू म्हणून राहिला—अशा रीतीने सतत ९ वर्षे तो लपून रहात होता. आपल्या जागेचा जरासा पत्ता लागतो आहेसे वाटले की रातोरात तो जागा बदलीत असे. खोलीत कोडून घेत असे. आईवडिलापाशी मुळीच थारा नव्हता. अशा स्थितीत या दिवाण्या तरुणाची महत्त्वाकाक्षा काय असणार ? एखाद्या खूप श्रीमत विधवेशी लग्न व्हावे ही त्याची महत्त्वाकाक्षा होती—ते गोड स्वप्न उराशी कवटाळीत तो कसाबसा जगत होता.

वयाच्या तिसाव्या वर्षी बाल्झॅकला साहित्य क्षेत्रात भरपूर प्रसिद्धी मिळाली. मग आपण चागल्या प्रतिष्ठित कुळात जन्मलो आहोत असे भासविण्यासाठी त्याने आपल्या नावात थोडासा बदल करून ऑनर डी बाल्झॅक असे नाव लिहिण्यास सुरुवात केली आता त्याच्या लिखाणाला निरनिराळ्या मासिकाकडून मागणी येऊ लागली. त्याच्या हलक्याफुलक्या (खरे तर अत्यत चावटपणाच्या) कथा फ्रेच वाचकाना अतिशय आवडल्या. निरनिराळे सपादक त्याच्याजवळ लिखाण मागू लागले. बाल्झॅक अत्यत वेगाने लिखाण करू लागला. रोज सुमारे छापील सोळा पाने होतील एवढा मजकूर तो लिहीत असे. त्याचे लिखाण इटाली, स्कँडिनेव्हिया, पोलड, रशिया इ. देशातही लोकप्रीय होत होते. (भाषातरे पटापट होत असत.) त्याच्या प्रतिभेचे उन्मेष सबध युरोपला चकीत करीत होते. La pean de Chargin ह्या साहित्यकृतीत त्याच्या मर्मग्राही प्रतिभेचा स्वच्छ प्रत्यय आलेला होता. त्याच्याजवळ साहित्याचे प्रचड सचित जमा झालेले होते. त्या बळावर त्याला आपल्या आयुष्याची दिशा निश्चित करता आली असती. पण...

बाल्झॅकची कल्पनाशक्ती अत्यत प्रभावी होती. ती शक्ती जेव्हा साहित्यक्षेत्रात उपयोजित होई तेव्हा ते वरदान ठरून सर्वांगसुदर साहित्यकृतीचा रसिकाना लाभ होई. परतु साहित्येतर क्षेत्रात जेव्हा या विलक्षण तरल कल्पनाशक्तीचा सचार होई, तेव्हा तो एक भयकर शाप ठरत असे. त्याच्या कल्पनाशक्तीने त्याचा असा गैरसमज करून दिला होता की तो कोणत्याही क्षेत्रात गेला तरी अग्रभागी चमकेलच हा आत्मविश्वास अनाठायी होता त्यापायी त्याला आयुष्यभर खूप ठोकरा बसल्या परतु अनुभवाने शहाणे होण्या इतपत व्यवहारज्ञान त्याच्यापाशी खरोखरीच नव्हते. १८३० मधील घडामोडीनतर तरुणाना राजकारणात खूप वाव आहे अशी त्याची कल्पना झाली. लगेच निवडणुकीला उभा राहिला—पडणार हे उघडच होते. पैशाची नासाडी—विलक्षण ओढगस्त—फक्त मनस्तापाखेरीज काहीही पदरात पडले नाही. म्हणजे तिसाव्या वर्षी बाल्झॅकच्या प्रतिभेचा अश्वत्थवृक्ष जरी खोल पाळेमुळे रोवून उभा असला तरी जीवनात सुस्थिर होणे मात्र त्याला मुळीच जमले नाही.

कल्पनाशक्तीप्रमाणेच त्याची प्रत्येक कृती उत्कट असे. हसला तरी इतका मोठ्याने खदखदा हसे की, भिंतीवरची चित्रे थरथरायची. बोलायला लागला की त्याचे अवघे व्यक्तिमत्त्वच बोलके झाल्यासारखे वाटत राही प्रवास करताना तो घोड्यांना अगदी तडाकून पळायला लावी. कामाला भिडला की एखादी अतिमानुषी शक्ती अंगात सचारल्याप्रमाणे १२–१२ तास लिखाण करीत असे जेवायला बसला की ब्रह्मानदी टाळी लागून भरपूर आहार घेत बसे. एखाद्या खानदानी जमीनदाराच्या रुबाबात रहायची त्याला भारी हौस ! त्यासाठी उत्तम कपडे, सोन्याची बटने इ रुबाव चालायचा. पण हा उसना रुबाव (पर्यायी कर्ज काढून केलेला) त्याच्या आडदाड व किंचित रासवट अशा व्यक्तिमत्त्वाशी मुळीच सुसगत नसल्याने उपरा, नकली, विशोभित असा दिसायचा बाल्झॅकच्या वागण्यावर अभिजात सस्काराची, उत्तम रीतीरिवाजाची (manners) झिलई मुळीच नव्हती तो अगदीच रागडा, आडदाड, कुरूप, जाडगेला असा दिसायचा. त्याचे ते सातमजली हसणे, जेवताना मच् मच् आवाज करणे या पायी पॅरिसच्या उच्च समाजात त्याला स्थान मिळेना. त्याची खुपशी व्यक्तिचित्रे प्रसिद्ध होत, आणि त्यातून त्याच्या हेगाड्या देहाचे आणखीच हसे होई. तो आला, की पॅरिसमधल्या फॅशनेबल बायका तोडापुढे पखा धरून कसेबसे हसू दावण्याचा प्रयत्न करीत. करणार काय ? ते ध्यानच तसे दिव्य दिसत असे, बायका आपल्याला हसतात हे लक्षात आले, की तो आणखीच फॅशन करायचा आणि प्रचड उपहासाचा विषय बनायचा. बाल्झॅकला पहायचे, ते त्याच्या साहित्यात—प्रत्यक्षात नाही !

बाल्झॅकचे मित्रमडळ मात्र अगदीच छोटेसे होते. कारण गप्पा मारायला त्याला कधीही वेळ नसे. पत्रव्यवहार भरपूर. येणाऱ्या पत्रापैकी ९०% पत्रे स्त्रियाची असत. तो काही 'डॉन ज्युआन' नव्हता. त्याला एक श्रीमत विधवा पत्नी म्हणून हवी होती. मदाम बर्नी आता ५४ वर्षांची झाल्याने परस्पराचे आकर्षण विलयाला गेले होते. नव्याने भेटलेली प्रौढ डचेस डी ॲब्रान्टिस ही त्याची प्रेयसी झाली. एका डचेसने आपल्या स्नेहबधनात गुतून जावे याचा बाल्झॅकला कोण अभिमान ! ही डचेस अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनाची साक्षीदार होती. तिने नेपोलियनला पाहिलेले होते—त्याच्याशी बातचीत केली होती. एवगुणीविशिष्ट डचेसची जवळीक बाल्झॅकचा 'अहम्' फुलविण्यास वास्तविक पुरेशी होती. तथापी ही मैत्री काही टिकली नाही. कारण डचेस निर्धन होती—बाल्झॅकप्रमाणेच

कर्जात बुडालेली होती. असली मैत्री करणे त्याला कसे परवडणार? लवकरच हा अध्याय सपला. बाल्झॅकच्या लिखाणाचा प्रभाव वाढत होता. अनेक साहित्यप्रेमी स्त्रियाना त्याच्या मैत्रीची ओढ होती. झुल्मा कॅरॅड या अत्यत सुजाण अशा टीकाकार स्त्रीशी बाल्झॅकची मैत्री झाली. मात्र ही मैत्री सपूर्णतया 'प्लॅटॉनिक' अशी होती–विदेही होती. ती त्याची 'गृहिणी' जरी नाही, तरी 'सचिव. सखी, प्रियशिष्या' इ. मात्र जरूर होती. बाल्झॅकच्या प्रतिभेविषयी तिला गाढ प्रेमादार होता. तिचे शुद्ध, चिवट प्रेमबधन हा बाल्झॅकला मिळालेला फार मोठा ठेवा होता. त्याच्या जीवनात अनेक स्त्रिया येऊन गेल्या. परतु झुल्माच्या 'विदग्ध बावनकशी प्रीती'ची सर इतर कोणालाही येऊ शकली नाही बाल्झॅक सतत लिहीत होता. त्याचे वाङ्मय भाषातरित झाल्याने वाचकवर्ग खूपच मोठा झालेला होता खूप मोठा पत्रव्यवहार साभाळावा लागे. तथापी पगारी मदतनीस ठेवणे जमत नव्हते. झुल्मा त्या बाबतीत जमेल तेवढी मदत करीत असे. हक्काची बायको मिळाल्यास सर्वच दृष्टीने सोयीचे होईल ही त्याची आशा. आपल्यासाठी योग्य वधू निवडण्याची तो झुल्माला व स्वत.च्या बहिणीला एकसारखी गळ घालीत होता. तथापी अशा कर्जबाजारी, कुरूप माणसाशी लग्न करायला कोणतीही वधू तयार होत नसावी.

बाल्झॅकच्या अफाट कल्पनाशक्तीमुळे पुष्कळदा अव्यवहारीपणा होई. आणि साराच उद्योग गोत्यात येऊन आर्थिक स्थिती अधिकाधिक खालावत जाई. लिखाणाला सुरुवात केली, की तो ते सर्व प्रकाशकाला विकून टाकीत असे. पैसे आले, की परस्पर कर्जदाराकडे जात. हा आपला मधल्यामध्ये खक! त्याचे नशीबच इतके विचित्र होते, की तो ज्याला हात लावी, त्याचे जणू कर्जातच रूपातर होऊन जाई. सतत आर्थिक ताण! अत्यत आणीबाणीची परिस्थिती आली, म्हणजे तो आईच्या आश्रयाला जाई. आई थोड्याशा मदतीचा तुकडा अगावर फेकीत असे, पण तसे करतानासुद्धा अगदी नकोसे वाटायला लावी! साहित्यक्षेत्रात अपरपार प्रसिद्धी लाभूनही एखादी श्रीमत विधवा आपणास का लाभू नये हे त्याला कळेना. सक्तीच्या ब्रह्मचर्याचा त्याला विलक्षण कंटाळा आला होता. कर्जदार आणि प्रकाशक हे दोन राहू-केतू त्याला ग्रासून टाकीत होते. त्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी तो रोजी १५–१५ तास लिखाण करी. अडचणी जितक्या तीव्र तितकीच लिखाणाची प्रेरणाही तीव्र होत असे. वेगाने लिखाण होई. कथा, कादबऱ्या, वर्तमानपत्रातून निबध, स्फुटलेखन या साऱ्या लेखनप्रकारात त्याच्या लेखणीचा अनिरुद्ध सचार चाललेला असायचा. Eugenie Grandet या कादबरीला अमाप लोकप्रीयता मिळाली होती. 'ह्यूमन कॉमेडी' या अभिजात कलाकृतीचा आकृतीबध आकार घेत होता. एकदर 'ह्यूमन कॅमेडी'त कसकशी ग्रथ रचना करीत जायचे याचा कच्चा आराखडा त्याच्या सुप्त मनात तयार होत होता. त्याची कीर्ती अमर करणारी अलौकिक कलाकृती तो लिहीत होता. व्यक्तिजीवनात मात्र तो अत्यत निष्प्रेम, अपयशी, निर्धन, कर्जात बुडालेला असा होता. 'या आपत्तीमुळेच माझे मन ब्रॉझसारखे कणखर बनले आहे' अशी त्याची समजूत होती.

बाल्झॅकच्या दुर्दैवाची कमान सतत वाढतच होती. त्याच्या आयुष्यातली अत्यत हतभागी घटना म्हणजे २ फेब्रुवारी १८३२ रोजी त्याला आलेले एक निनावी पत्र! साधे निनावी पत्र! पण त्याने बाल्झॅकच्या सर्व उर्वरित आयुष्याला चूड लावली. हे पत्र रशियातील युक्रेन प्रातातील एका लहानशा खेड्यातून आलेले होते. पत्र लिहिणारी व्यक्ती म्हणजे एक श्रीमत, प्रतिष्ठित बॅरोनेस् होती. समाजाच्या उच्च स्तरातील असल्याने तत्कालीन रीतिरिवाजानुसार फ्रेंच भाषेत प्रवीण होती. फ्रेंच वाङ्मयाची तिला फार फार आवड. फ्रेंच वाङ्मय वाचणे, वर्तमानपत्रे वाचणे ही प्रतिष्ठेची खूण होती. त्यामुळे ही निनावी पत्र लेखिका (मदाम डी हन्स्का) बाल्झॅकचे सर्व लिखाण अत्यत आवडीने वाचीत असे. साहित्यविषयक चर्चा करण्याजोगते तिच्या आसपास कोणीही नव्हते. रहाणे खेड्यात म्हणून बौद्धिक चर्चा करायला चागलासा शेजारही नव्हता. नवरा २५ वर्षांनी मोठा. खेरीज व्यक्तिजीवनात फार मोठी पोकळी होती. ७ पैकी ६ मुले मरण पावलेली! फक्त १ मुलगी हयात. तिला सांभाळायला आया-दाया इ. नोकर! मदामला नट, लेखक, व राजकारणी पुरुष याच्याविषयी अपार कुतूहल होते. श्रीमती आणि भरपूर नोकरचाकर असल्याने तिला घरात काहीही काम नसे. प्रचड रिकामा वेळ...! एक दिवस तिच्या रिकाम्या मनाला काही तरी चित्तथरारक चाळा करावासा वाटला. तिने बाल्झॅकला एक अत्यत उत्कट प्रणयपत्र लिहिले त्याच्या वाङ्मयाची खूप स्तुती केली. पुष्कळसा भावविवश मजकूर लिहिला. पत्रावर नाव, गाव, पत्ता इ. काहीही नसल्याने त्या स्नेहार्द्र पत्राला बाल्झॅक उत्तर लिहू शकला नाही बाकी मदामला प्रथम उत्तराची अपेक्षाही नव्हती. उगीच आपला हवेत बार काढण्याचाच तो प्रकार होता. महिनाभराने तिने तोच खेळ पुन्हा एकदा खेळून पाहिला. बाल्झॅकसारख्या प्रतिभावंताशी असला जीवघेणा खेळ खेळण्यात एक क्रूर गमत होती खरीच! आपल्या पत्राचे बाल्झॅकवर काय काय परिणाम होत असतील याची मानसचित्रे रंगवीत बसणे हा तिचा आवडता छद बनला. इकडे बाल्झॅक मात्र खतावत होता आपल्या लिखाणावर लुब्ध असलेल्या रसिकराज्ञीने असे अज्ञात रहावे, आपणास साधे उत्तरही पाठवता येऊ नये याची त्याला खत वाटत होती. मग त्याने आपला नवा कथासग्रह त्या अज्ञात रसिक राज्ञीस अर्पण केला बाल्झॅकची ही चतुर अर्पण पत्रिका मदामला फार पसत पडली. आणि मग फ्रान्सच्या या श्रेष्ठ प्रतिभावताशी तिने उदीर-माजराचा खेळ सुरू केला. केवळ नवथर प्रणयिनीलाच शोभेल असा आर्त मजकूर ती सतत लिहू लागली. मग तिला अशी शका आली की आपण इतकी पत्रे लिहतो, पण ती बाल्झॅकपर्यंत नक्की पोहोचतात का? मग तिने एका विशिष्ट वर्तमानपत्रातून आपल्या पत्राची पोच देण्याची बाल्झॅकला विनती केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही विनती बाल्झॅकने मानली!

सहज गमत म्हणून सुरू केलेला खेळ इतका प्रभावी ठरेल, बाल्झॅकसारखा श्रेष्ठ कलावत आपल्या खोडसाळ, पोरकट पत्राची दाद घेईल अशी मदामला काही कल्पना नव्हती. यापुढे ती आपल्या सहीसह प्रेमपत्रे लिहू लागली व नवऱ्याला कळू नये म्हणून मुलीच्या दाईच्या पत्त्यावर उत्तरे मागवू लागली. जुगारीचा जसा नशा चढत जातो, तशीच तिची स्थिती होती. दोघांची पत्रे अधिकाधिक उद्दीपक

होऊ लागली. बाल्झॅकला त्या अज्ञात स्त्रीचा मोह आवरेना. सारखी ओढ लागून राहिली. यानतर मदाम सहकुटुंब युरोपच्या प्रवासास निघाली. त्यात एका मुक्कामी दोघांची निसटती भेट झाली. या भेटीचा बाल्झॅकच्या मनावर एखाद्या क्षुधावर्धक पेयाप्रमाणे परिणाम झाला. मदामच्या उच्च कुलाची, अभिजात श्रीमतीची त्याच्या मनावर भुरळ पडली. इतक्या श्रेष्ठ, प्रतिष्ठित स्त्रीच्या प्रेमास आपण सर्वथैव पात्र ठरावे म्हणून त्याने अधिकाधिक दर्जेदार लिखाण करायला सुरुवात केली. युजीन ग्रॅण्डेट्सारख्या त्याच्या अनेक ललितकृतींच्या आवृत्त्या निघत होत्या. लोकप्रीयता वाढत होती. तेव्हा अशा प्रतिभासपन्न कादबरीकाराच्या प्रेमाचा विषय आपण असावे ही कल्पना मदामचा अहकार फुलवीत होती. मात्र काडीमोड घेऊन बाल्झॅकशी लग्न करणे तिला व्यवहार्य वाटेना. ती त्याला नुसती चाळवीत होती. दोघेजण नियमाने रोज एकमेकाना उत्कट प्रेमपत्रे लिहीत. फक्त त्या मेघदूतावर समाधान ! सारी पत्रे साठविण्यासाठी सुदर कोरीव काम केलेल्या लाकडी पेट्या दोघानी एकमेकाना भेट दिल्या होत्या.

बाल्झॅकचा आशावाद विलक्षण जबरदस्त म्हटला पाहिजे. त्याला वाटे की काही तरी चमत्कार घडेल, अन् मदाम डी हन्स्का सर्व इस्टेटीसह आपणाकडे चालून येईल. हिच्या प्रेमाचा लाभ हाच मुळी चमत्कार नव्हता का ? मग एक घडला, तसा दुसरा का घडणार नाही ? आपण तिच्या तोलामोलाचे आहोत असे दाखविण्यासाठी बाल्झॅक खूप बडेजाव करू लागला. कर्जे वाढत गेले. जप्ती व त्यामुळे होणारी नाचक्की टाळण्यासाठी अक्षरशः विद्युद्वेगाने तो रोजी १५ तास लिखाण करू लागला ! आपणासाठी त्याची जी तडफड तडफड चालली होती त्याची मदामला खूपच गमत वाटत होती. तो इटालीत सफर करीत होती, तेथील कलावताकडून स्वतःची पोर्ट्रेट्स काढवून घेत होती. मार्केटिंग हा तर तिचा आवडता छद... आणि त्या सर्व सुखविलासाच्या जोडीला गोड शिरशिरी आणणारी ती बाल्झॅकची पत्रे ! तिला खुद्द बाल्झॅकपेक्षा त्याचा प्रेमपत्राचेच अप्रूप वाटत होते. बाल्झॅकने मात्र स्वतःचे अवघे व्यक्तिमत्त्व तिच्या पायाशी झोकून दिलेले होते. तिचा क्रूर खेळ त्याला कधीही ओळखता आला नाही.

बाल्झॅकच्या वयाची पस्तीशी उलटली. भयानक यातनापर्व सुरू झाले. उभा दिवस सकटाने होरपळून निघू लागला. सुटकेचे सारे दरवाजे बद ! मदाम डी बर्नी अतिशय थकली होती. त्यामुळे प्रुफे तपासायला होणारी तिची मदत बद झाली. भाऊ भारतात जाऊन आला होता. शुद्ध टोणपा बनला होता. आई तर जन्मापासूनच नाखूश होती. प्रकाशकाशी अविरत झगडे ! तशात एका प्रकाशकाने त्याच्या अनुमतीशिवाय त्याचे लिखाण परभाषेत भाषातर करून छापले. बाल्झॅक सतापाने पेटून निघाला. प्रकाशकाला कोर्टात खेचले. कोर्टात बाल्झॅकचा विजय झाला ही गोष्ट खरी, पण व्यवहारात त्याचा भलताच तोटा झाला. कारण प्रकाशकाच्या ताब्यात दोन तीन मासिके होती. त्यातून बाल्झॅकला हास्यापद ठरविणारे लेख छापून आणण्याचा त्याने धडाका चालविला. बाल्झॅकची अनेक हेंगाडी व्यगचित्रे, त्याचे सर्व दोष (साहित्यातले आणि खाजगी आयुष्यातले) सातत्याने प्रकाशात आणण्याचा नीचपणा प्रकाशकाने अवलबिला. याविरुद्ध इतर लेखकानी आवाज उठवला नाही. त्यानीही पर्यायाने प्रकाशकाचे सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्व मान्य केले. फक्त व्हिक्टर ह्यूगो व जॉर्ज सँड या दोघानी प्रकाशकापुढे मान तुकविण्यास नकार दिला. संपादकाच्या सास्कृतिक सत्तेची चुणुक समजताच आपणही सपादक व्हावे असे बाल्झॅकला वाटू लागले. ते धाडस अगाशी येऊन ४० हजार फ्रॅक्सचे कर्ज डोक्यावर बसले, पुनश्च छापखाना चालविण्याचा मोह झाला. अभिजात वाङ्मयाचे उत्तम नमुने छापण्यास सुरुवात झाली. परतु सर्व कारखाना आगीच्या भक्षस्थानी पडला. छापलेल्या पानांची आगीत आहुती पडली. नित्य नव्या आपत्तीनी तो होरपळत होता. आलेली पत्रे वाचायचेसुद्धा त्याला धाडस होत नसे. कोण जाणे आणखी काय सकट वाढून ठेवलय ते ? नकोच वाचायला ! बेलिफांना चुकविण्यासाठी जो पळ काढीत होता. तशात सक्तीच्या लष्कर भरतीचा फतवा आला. सी. आय. डी. च्या काकदृष्टीतून त्याला निसटता आले नाही. परिणामी तुरुगवास ! पण नवा अनुभव ! नवी कथानके. लिखाणाचे सत्र मात्र थाबत नव्हते. यत्किंचितही विश्राती घेणे शक्य नव्हते.

मात्र एवढया आपत्तीच्या सतत माऱ्यामुळे त्याची मूळची पोलादासारखी प्रकृती ढासळू लागली. तरीही रोजी १५ तास लेखन करण्याची त्याची धडपड केवळ विस्मयावहच मानली पाहिजे. Illusion Perdeues ही त्याची साहित्यनिष्ठेवरील कादबरी भरपूर गाजली. त्यात पुस्तकाच्या क्षेत्रातली भपकगिरी, अरेरावी, लबाडया यावर भरपूर प्रकाशझोत टाकलेले होते. १८३६ साली आर्थिकदृष्ट्या पराकोटीच्या अडचणी आल्या—बाहेर तोड दाखवायला जागा नव्हती. त्यावर फुकर घालणारी प्रेयसी होती. तिने स्वतःच्या खाजगी इस्टेटीविषयक कामाचे निमित्त करून त्याला २ वेळा परदेशी धाडून दिले—इटलीत सफर करण्याची सधी दिली. परदेशात बाल्झॅकची प्रतिमा केवढी तरी उदात्त ! सर्वत्र मानसन्मान पण घरी आला की लगेच बेलिफाचे ससेमिरे सुरू होत. तशात मदाम डी बर्नी मरण पावली. तशी ती खूपच म्हातारी झाली होती. पण ते एक बाल्झॅकचे विश्वासाचे ठिकाण होते. तिच्याबरोबर आपले तारुण्यही गाडले जात असल्याचा त्याला भास झाला. ह्यूमन कॉमेडी ही लोकोत्तर कलाकृती लिहिण्यास सुरुवात झाली होती खरी, पण एकाद्या भव्य वास्तूचे निवळ खाब उभे करावेत, इतपतच काम झालेले होते. आजवर त्याने ३० हून अधिक कादबऱ्या लिहिल्या होत्या. अवातर लेखन तर अमाप होते. तरीही त्याला स्वायत्तता लाभली नव्हती. प्रकाशकाच्या तालावर नाचावे लागे, मित्राच्या दयेवर जगावे लागे. वर्तमानपत्रातून उपहासाच्या फैरी झडत. आणि तिकडे रशियात...एका खेडेगावावातून बाल्झॅकच्या जिवाशी खेळ करणारी मदाम डी हन्स्का त्याच्या वागणुकीचा सशय घेत बसे ! कारण पॅरिसमधले तिचे नातेवाईक बाल्झॅकवर हेरगिरी करून मदामला सर्व काही कळवीत असत. विशेषत. नको तेवढेच आवर्जून, फुगवून लिहीत असत. यातनाचक्रातून बिचाऱ्याची सुटका नव्हती. आत्मक्लेशाला साहित्यात वाट फुटत होती. Cesar Birottean या कादबरीतील कर्जाने टेकीस आलेल्या नायकाची कहाणी जवळ जवळ आत्मकथेच्या स्वरूपाचीच आहे.

१८३७–३८ पासून बाल्झॅकला स्वत:चे घर बांधण्याचे वेध लागले. त्याची अफाट कल्पनाशक्ती साहित्येतर सर्व क्षेत्रात वावरू लागली की काही तरी धोका व्हायचाच कल्पनेची एकदम गरुडझेप ! तो भराभरा जमिनी घेत सुटला. पुढे येथून रेल्वेलाईन जाईल आणि सरकारकडून सपाटून कॉपेन्सेशन मिळवता येईल ही त्याची कल्पना ! अर्थात चुकीची ! घर बाधायला जेमतेम सुरुवात झाली, तोच सर्व पैसे संपून गेले सुतार, गवडी, इंजिनियर याना काम करता येईना. मग बाल्झॅक एकदम गायबच झाला. मैत्रिणीच्या इस्टेटीचे निमित्त करून इटालीत पसार ! तेवढीच विश्राती ! पण त्या विश्रातीतही त्याची कल्पनाशक्ती वाऱ्यावर भराऱ्या मारीतच होती. इटालीला बोटीतून उतरल्यावर तेथे साथ असल्याने दिवसभर क्वॅरंटाईन कॅंप-मध्ये रहावे लागले. सोबतीला असलेला एक बोलघेवडा प्रवासी भलतीच कल्पनारम्य बडबड करीत होता. सहज गप्पा मारता मारता त्याने सार्डोनियातल्या खाणीत भरपूर चादीचा साठा असल्याची गुप्त (?) बातमी बाल्झॅकला सागितली. झाले ! बाल्झॅकचा कल्पनावारू, लगेच चौखूर उधळू लागला. सार्डोनियात जाऊन एखादी चादीची खाणच्या खाण विकत घ्यावी आणि पर्यायाने अपरपार सपत्ती मिळवावी या कल्पनेने तो अगदी झपाटून गेला. त्या साऱ्या कल्पनारम्य भराऱ्या प्रत्यक्षात उतरविण्याची धडपड ! मित्राकडून अपार कर्ज...अत्यत अवघड असा सार्डोनियापर्यंतचा खडतर प्रवास . हे सारे त्याने केले. तथापी बरोबर कोणी तज्ञ, तज्ज्ञ नेण्याइतपत व्यवहारज्ञान नसल्यामुळे सारा हेलपाटा फुकटच गेला. प्रकृतीही ढासळली. यानतर अवघ्या १० वर्षांनी तेथील खाणी-तून खरोखरच भरपूर चादी मिळाली. पण बाल्झॅकच्या नशिबी मात्र यातना आणि हेलपाटा याखेरीज काहीही नव्हते !

इतःपर यातनाचक्राचा वेग विलक्षण वाढला. इटालीतून परत आल्यावर नव्याने बाधलेल्या अर्धवट घरात तो रहायला आला. परतु ती जमीन वास्तू उभारण्याच्या दृष्टीने फारच भुसभुशीत, कच्ची असल्याने अर्धवट बाधकाम कोसळले. त्याबरोबरच सर्वांग सुदर घराविषयीची त्याची कल्पनाही जमीनदोस्त झाली. यानतर त्याने नाटक लिहिण्याची शक्कल काढली. वास्तविक त्याच्या प्रतिभेला रगभूमीचे माध्यम सोयीचे नव्हते–धाटणीच वेगळी होती ! पण नाटककाराना मिळणाऱ्या पैशाचा मोह होता. नाटकाचे नाव निश्चित करून ते दिग्दर्शकाला विकूनही टाकले. विशिष्ट दिवशी हस्तलिखित देण्याचा वायदा होता. त्या दिवसाच्या आदल्या रात्री-पर्यंत नाटकाचे एक अक्षरही त्याने लिहिलेले नव्हते. नतर ४ मित्राना जमवून त्याने मध्यवर्ती कल्पना सागितली व प्रत्येकाला एकेक अक लिहायला लावला. पाचव्या अकात आपण सर्व अकाचे सकलन करण्याचे ठरविले. असल्या सहकारी पतपेढीने केलेली नाटचरचना किती हास्यास्पद असणार ते उघडच होते. सर्वस्वी फज्जा उडाला ! पण अनुभवाने शहाणे होण्याइतपत व्यवहार समजत नसल्याने बाल्झॅकने आणखी ३–४ वेळा नाटचक्षेत्रात अयशस्वी लुडबूड केलीच. त्याचे फक्त एकच नाटक प्रेक्षकानी मानले . पण ते त्याच्या मृत्यूनतर ..

गेल्या चार-पाच वर्षात बाल्झॅकने इतके लिहिले होते की त्यावर त्याला जन्मभर अभिमानाने जगता आले असते. पण त्याचा ग्रह-गुणच असा विचित्र होता की त्याच्या हाती पैसा काही रहात असे. साऱ्या योजना अपेशी ठरत. वाङमयात तो अमर व्यक्तिरेखाची अप्रतीम सृष्टी निर्माण करीत होता, वास्तवात मात्र पुरा खक होता !

चाळिशी उलटून गेली. अद्याप त्याच्यापाशी हक्काचा पैसा, हक्काचे घर, बायको ह्यापैकी काहीही नव्हते. मदाम डी हन्स्काचे प्रियाराधन कधी सपणार ते समजत नव्हते. एवढचात तिमिरावगुठीत अवकाशात बाल्झॅकला आशेचा तारा दिसला. मदामच्या नवऱ्याच्या मृत्यूची चिरवाछित वार्ता आली. श्रीमत विधवेशी लग्न करण्याची आपली ' महत्त्वाकाक्षा ' आता सफळ होणार म्हणून त्याला अतो-नात आनद झाला. मदामने शक्य तेवढचा लवकर विवाहास रुकार द्यावा म्हणून त्याने प्रयत्नाची पराकाष्ठा केली. तथापि मदाम कमालीची आत्मरत स्त्री होती. सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने बाल्झॅक तिला हीन पातळीवरचा वाटत होता. तो म्हणजे एक नकोसे लोढणे आहे अशी तिची भावना होती. लग्नाचा विचार ती सारखा पुढे ढकलीत होती–सबबी सागत होती. तिला बाल्झॅकच्या कीर्तीचा झगमगाट हवा होता. लेखकाची प्रेयसी म्हणून वाटयाला येणारे नेत्रदीपक वलय हवे होते–पण बाल्झॅक मात्र नको होता–आणि ही गोष्ट काही त्याच्या डोक्यात शिरत नव्हती !

मुलीच्या लग्नानतर का होईना, पण मदाम आपला स्वीकार करील ही त्याला आशा होती. त्याच सुमारास ' निवडक बाल्झॅक ' प्रसिद्ध झाले नव्या उमेदीने तो सतत लिहीत होता. त्याची कल्पना-शक्ती उत्तुग भराऱ्या मारीत होती. वैवाहिक जीवनाविषयीची केवढी सुदर चित्रे त्याच्या मनात तरळत होती ! आपल्या बायकोला स्वतःच्या घरी आल्याबरोबर अगदी महाराणीसारखे वाटले पाहिजे ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी सर्व धडपड ! स्फूर्तीचा एक जबरदस्त झटकाच आला म्हणाना ! त्याने एक नवे उत्तम घर बाधून घेतले. भोवती बगीचा... उत्तमोत्तम फर्निचर... उची गालीचे... दुर्मीळ पेंटिंग्स् . सुसज्ज वाचनालय... जागोजाग फुलदाण्या... पुतळे... उत्तमोत्तम वस्तूचा सग्रह.. हे सारे राणीच्या स्वागतासाठी तयार ठेवण्यासाठी धडपड सुरू झाली. स्वतःच्या जीवनानुभवाचे सारे रग कादबऱ्यातून शब्दरूपाने व्यक्त होतच होते. त्यावर खूपच पैसा मिळत होता. तरीही राणी सरकाराची तव्येत राखण्यासाठी ६०,००० फ्रॅंक्सचे कर्ज डोक्यावर होते. जिच्या पायी हा ताण तो सोशीत होता, ती त्याला टाळण्याच्या हरप्रकारच्या युक्त्या शोधण्यात मग्न होती.

बाल्झॅक लग्नासाठी इतका उत्सुक होता, की मदाम आपल्या सोयीने फ्रान्सला येईपर्यंत त्याला दम धरवत नव्हता. मग तो स्वतःच युक्रेनला निघाला. मदामने त्यावेळी पचेचाळीशी ओलाडली होती. तिला बाल्झॅकचे खडबडीत व्यक्तिमत्त्व अजिबात आवडेना. मध्यतरी मुलीचे लग्न होऊन गेल्यामुळे लग्नाचा विचार पुढे ढकलण्यास बळकट सबबही सापडेना. दुर्दैवाने बाल्झॅकला रशियाची अत्यंत सर्द हवा मानवली नाही. ब्रॉंकायटिसचा जबरदस्त अटॅक आला. ताप मुरला. थडीने तो गोठून जाई. फुप्फुसाला सूज आली. अशा स्थितीत परतीचा प्रवासही झेपेना. दृष्टी मद झाली. लिहिता येईना ! बिचारा अथरुणाला अगदी खिळून गेला. या दुखण्यातून तो उठणे अशक्य आहे असा डॉक्टरानी नर्णय दिला. या थरावर गोष्टी आल्या,

तेव्हा कुठे मदामच्या कठोर हृदयाला पाझर फुटला. तिला बाल्झॅकची करुणा आली. केवळ दयाबुद्धीने तिने लग्नास रुकार दिला. अखेर बाल्झॅकच्या ५१ व्या वर्षी श्रीमंत विधवेशी लग्न करण्याचे त्याचे चिरवांछित स्वप्न प्रत्यक्षात आले. सासूसासऱ्याच्या लग्नाला लेक व जावई यांची साक्ष !

यानंतर नवपरिणित जोडपे पॅरिसला आपल्या घरी येण्यास निघाले. प्रवास प्रदीर्घ होता—तापदायक होता. बाल्झॅकचा आजार दिवसेंदिवस बळावत होता. सपाटून घाम येई व शक्ती नाहीशी होऊन जाई. एवढ्या दुहेरी बांध्याचा अडदाड गडी तो, पण आता अगदी वाळून कोळ झाला होता. ओळखायला येणार नाही इतका फरक पडला होता. जिने चढवेनात, प्रवास झेपेना... दृष्टी मंदावत चालली—लिहिणे अशक्य ! पण नव्या नवरीला उत्साहाच्या लहरीवर लहरी येत होत्या बाल्झॅकची कणव तर आली नाहीच, उलट बाजार करण्याच्या अत्यंत आवडीच्या कामात बाल्झॅकमुळे व्यत्यय येतो असेच तिला वाटत राहिले येताना एका प्रसिद्ध जवाहिऱ्याकडून तिने ३५०० फ्रॅंक्सचे नेकलेस हौशीने खरेदी केले. बाल्झॅक अखेरचे दिवस मोजीत होता. बायकोला डागदागिने सुचत होते !

आपण जेव्हा गृहलक्ष्मीला घेऊन घरी येऊ, तेव्हा आपले घर तिला कसे दिसले पाहिजे या संबंधीचा संपूर्ण तपशील त्याने घरी कळविला होता. आईने ती सर्व तयारी स्वतःच्या देखरेखीखाली करवून घ्यावी—ठिकठिकाणी फुलदाण्या ठेवाव्यात—सर्वत्र दिवे झगमगत असावेत. जय्यत तयारी झाल्यावर मग मात्र आईने घरात न थांबता निघून जावे अशी सूचना करायला तो विसरला नाही. शेवटी एकदा शेकडो मैलांचा प्रवास करून खिळखिळा झालेला पोकळ देह कसावसा सावरीत—सावरीत तो घरी आला. त्याच्या आज्ञेनुसार घर दिव्यांनी प्रकाशमान झालेले दिसत होते. बाल्झॅकने गाडीतून उतरून बेल वाजवली. कोणीही दार उघडीना. बराच वेळ प्रयत्न करूनही दार बंदच राहिले. अखेर लोहार-सुतार यांनी धडपड करून कुलूप तोडून—दार पाडून आत जावे लागले आत पाहतो तो काय, त्याच्या इमानी नोकराला चक्क वेड लागलेले होते. बाल्झॅकच्या आयुष्यातल्या अत्यंत आनंदाच्या क्षणीच नेमके त्या नोकराला वेड लागावे हे केवढे दुर्दैव ! मध्यरात्री त्या नोकराला वेड्याच्या इस्पितळात पोहोचविले, आणि मग कुठे मदामने गृहप्रवेश केला. तोवर ती रस्त्यावर गाडीतच बसून राहिली होती !

अतःपर आपणास कमीत कमी पंचवीस वर्षांचे तरी आयुष्य लाभेल अशी बाल्झॅकची कल्पना होती. आजवरचे आयुष्य हरप्रकारच्या काळजी काट्यांनी घायाळ झालेले होते. उरलेला काळ तरी मदामच्या सहवासात आनंदाने घालवावा, आर्थिक ताणाताणीचा विचारही करू नये, आणि मुख्य म्हणजे सूर लागेल त्याप्रमाणे साहित्य लिहावे हे बाल्झॅकचे लाडके स्वप्न होते ! पण येथवर आयुष्याची वाटचाल करीपर्यंत बाल्झॅक पुरा घायाळ झालेला होता. साऱ्या शक्ती तर आटून गेलेल्या होत्याच, पण सगळ्यात केविलवाणी गोष्ट म्हणजे त्याची दृष्टीही अधू झाली होती. लिहिणे-वाचणे अशक्य ! आंधळेपणाच आला होता. सारा पत्रव्यवहार मदामकडून करवून घ्यावा लागे— लिहवलेल्या एका पत्रातून तो मित्राला सांगत होता, 'आता मला लिहिता वाचता येत नाही रे ! काय करू !' ही ह्यूमन कॉमेडीच्या लेखकाची अवस्था !

आपल्या राजमहालासारख्या घरात आल्यापासून बाल्झॅक अंथरुणाला खिळलेला होता. अजिबात श्रम करायचे नाहीत अशी सक्त ताकीद होती. बोलायला सुद्धा डॉक्टरांची मनाई ! त्यापायी राजमहालात राहूनही तुरुंगवासासारखी कुचंबणा ! त्याची देखभाल करायला आई येऊन जाऊन असे. तथापी याच बाईने आपल्या कोवळ्या वयात आपणास स्नेहशून्य, रुक्ष जीवन जगायला लावले, हे बाल्झॅकला विसरता येईना. मदामला सुश्रूषा करणे आवडत नव्हते— ते काही आपल्यासारख्या बॅरोनेस्‌चे काम नाही अशी तिची कल्पना ! जे थोडे फार बाल्झॅकचे काम ती करीत होती, त्यात अलिप्त क्रौर्याची छटा स्पष्ट होती. तिचा मुळी बाल्झॅकवर जीव जडलेलाच नव्हता.

बाल्झॅकच्या जीवनाची अखेर अत्यंत कारुण्यपूर्ण झाली. त्याने आपल्या घरात सुसज्ज ग्रंथालय केलेले होते पण त्या ग्रंथालयातले एक पुस्तकही कधी त्याने उलगडले नाही. वरच्या मजल्यावर गॅलरीत उत्तमोत्तम पेंटिंग्स् लावलेली होती, पण त्या पिक्चर गॅलरीत कधी त्याचे पाऊल पडले नाही. व्हिक्टर ह्यूगो त्याला भेटण्यासाठी आला असता त्या रसिकराजाने आपली अभिरुची पहावी अशी बाल्झॅकची उत्कट इच्छा ! त्याने मदामला विनवणी केली, 'अग, यांना जरा आपली पिक्चर गॅलरी दाखव बर !' त्याचा हताश सूर अन् पांढराफटक चेहेरा पाहून भेटायला येणाऱ्याचे काळीज गलबलून जाई. आपला दिवाणखाना बाल्झॅकने अत्यंत अभिरुचीपूर्ण सजविलेला होता परंतु त्यात आरामाने बसून कधी कोणा पाहुण्याचे आगतस्वागत बाल्झॅकला करता आले नाही. दिवसें दिवस शक्ती हटत गेली आणि अखेर जगण्यासारखे सारे काही पायाशी लोळत असताच त्याने मृत्यूचा हात धरून इहलोक सोडला. लग्नानंतर अवघ्या पाच महिन्यांनी १७ ऑगस्ट १८५० रोजी बाल्झॅकचे आयुष्य संपले. फ्रेंच साहित्यातल्या एका प्रभावी पर्वाचा अस्त झाला. बाल्झॅकचे शव उचलण्यास व्हिक्टर ह्यूगो, अलेक्झॅण्डर ड्यूमाज, से ब्व्ह, मिनिस्टर्स इ. श्रेष्ठी उपस्थित होते. स्मशानभूमीवर बाल्झॅकच्या अमर साहित्याचे भरपूर गुणगान झाले... त्यातले थोडेसे जरी त्याने जिवंतपणी ऐकले असते तर ?... □ □

इडी चॅपमन हा जिलेग्नाईट गॅंग या घरफोड्यांचे टोळीचा दादा होता. कुठल्याही कंपनीची कितीही अभेद्य तिजोरी असो थोड्या जिलेग्नाईटचे मदतीने बोल बोल म्हणता उघडण्याबद्दल इडीची ख्याती होती. इतकी ख्याती होती की आंतरराष्ट्रीय गुन्हेगार जगतात सुद्धा त्याला फार मान होता. इंग्लंडमधील गुन्हेगार जगताचा तर तो राजाच होता. स्कॉटलंड यार्डकडे त्याचे नावावर ४७ मोठमोठ्या घरफोड्या जमा होत्या. त्याला पकडण्यासाठी स्कॉटलंड यार्डने साऱ्या इंग्लंडभर जाळे टाकले होते. त्याचा संबंध आला की ती केस खास दर्जाच्या अधिकाऱ्याचे हाती सोपवली जाई. शेवटी स्कॉटलंडयार्डचे खटपटीला यश आले. एक साधी घरफोडी करताना आपल्या दोन सहकाऱ्यांसह तो पकडला गेला. त्याचेवरील खटल्याचे वर्णनाने वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरले जाऊ लागले. त्याच्या वकिलाने त्याची जामिनावर सुटका करून घेतली. त्याचे खटल्याचा निकाल तर वृत्तपत्रातून चांगलाच गाजला. त्याला वीस वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. ही शिक्षा होणारच हे ओळखूनच की काय तो पुन्हा फरारी झाला होता. युरोपचे वाटेवर असताना जर्सी बेटात त्याला अटक करण्यात ब्रिटीश पोलिसांना यश मिळाले. जर्सीबेटावर त्याचेवर खटला चालला व त्याला तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. युद्ध सुरू झाले तेव्हा तो जर्सी बेटातील तुरुंगात आपली ही शिक्षा भोगीत होता. पण डंकर्क झाले. व नंतर थोड्याच दिवसात जर्मन सेनेने जर्सीबेट व्यापले. जर्मनांनी तुरुंगातील सर्व कैद्यांना सोडले. इडी चॅपमन पुन्हा तुरुंगातून बाहेर आला !

त्यानंतर थोड्याच दिवसात जर्सीबेटातील जर्मन हेरखात्याच्या कचेरीचे दार इडी चॅपमनने ठोठावले. आपल्या बद्दलची वृत्तपत्रातील कात्रणांची भेंडोळी त्याने आपल्याबरोबर घेतली होती. तेथील अधिकाऱ्याची भेट घेऊन तो म्हणाला, माझे नाव इडी चॅपमन. मी इंग्लंडमधील एक प्रसिद्ध घरफोड्या आहे. जगामधील कुलूप मी उघडू शकतो. ही वृत्तपत्रे पहा माझ्या कौशल्याबद्दल कसे रकानेच्या रकाने भरुन लिहितात ते. मी नुकताच घरफोडी करताना पकडलो गेलो होतो व इंग्लंडमधील तुरुंगात मला आता वीस वर्षे खडी फोडायची आहे. पण माझा इंग्लंडमधील गुन्हेगार जगतात एवढा अधिकार आहे की मी परत इंग्लंडला गेलो तर स्कॉटलंडयार्डला सहज झुकांडी देऊ शकेन. जर जर्मन सरकार भरपूर मोबदला देण्यास तयार असेल तर जर्मनांचे वतीने इंग्लंडमध्ये जाऊन हेरगिरी घातपात करावयास मी तयार आहे.

जर्मन हेरखात्याचा तो अधिकारी चांगला मुरलेला हेर होता, त्याने इडी चॅपमनची अगदी कसून उलट तपासणी घेतली. व दुसरे दिवशी येण्यास सांगून त्याने इडी चॅपमनला निरोप दिला. त्यानंतर बरेच दिवस इडी चॅपमन रोज जर्मन हेरखात्यामध्ये कचेरीला भेट देत होता व दररोज एकापेक्षा एक वरिष्ठ जर्मन हेरखात्याचे अधिकारी तास तास त्याची उलट तपासणी घेत होते. जर्मन हेरखात्याने स्वतंत्रपणेही त्याचेबद्दल चौकशी केली. शेवटी एक दिवस इडी चॅपमनला उमेदवार म्हणून जर्मन हेरखात्यात घेण्यात आले.

नंतर इडी चॅपमनचे हेरगिरीचे शिक्षण एका खास अधिकाऱ्याचे हाताखाली सुरू झाले. गुप्त शाईचा वापर, सांकेतीक भाषा, वायरलेस ऑपरेटरचे काम, छोटे पण शक्तीशाली स्फोटक बॉम्ब करण्याचे



● चा. अ. दाभोळकर ●

काम असे हेरगिरीचे व घातपाती कामासाठी लागणारे सर्व काही ज्ञान चोरांच्या त्या राजाने अगदी अल्पावधीतच आत्मसात केले. इंग्लंडमधील मॉस्किटो बॉम्बर तयार करण्याच्या कारखान्याचा बॉयलर किंवा विद्युतगृह उडवून तो कारखाना बंद पाडण्याचे काम त्याला देण्यात आले. कामगिरीवर जाताना त्याला खर्चासाठी रोख एक हजार ब्रिटीश पौंड देण्यात येणार होते. कामगिरी सफल झाल्यावर मोबदला म्हणून दहा हजार ब्रिटीश पौंड किंवा एक लाख जर्मन मार्क त्याला मिळणार होते. एका चांदण्यारात्री जर्मन विमानातून त्याला कारखान्याजवळच्या एका शेतात उतरवण्याचे ठरले. त्याप्रमाणे त्याला घेऊन जर्मन विमान इंग्लंडवर गेले. त्याने पॅरॅशूट उघडून खाली उडी मारली तोच ब्रिटीश विमानविरोधी तोफांनी त्याच्या विमानावर आग ओकायला सुरुवात केली. पण कोणतीही इजा न होता तो बरोबरचे स्फोटक पदार्थ, छोटा वायरलेस सेट, कॅमेरे वगैरेसह सुखरूपपणे जमिनीवर उतरला. उतरताच त्याने पॅरेशुटची घडी करून ती झुडुपात पुरून टाकली. बाकी सामान बरोबर घेतलेल्या सूटकेसमध्ये भरले व जवळच दिसणाऱ्या एका छपराच्या दिशेने दबकत दबकत वाटचाल चालू केली. त्या छपरात सर्वत्र काळोख होता. जवळ पोचल्यावर त्याचे लक्षात आले की ती एक मोडकळीस आलेली झोपडी आहे. ती रात्र त्याने निवांतपणे त्या झोपडीतच काढली. भल्या पहाटे उठून त्याने बरोबर आणलेला संभावीत इंग्रजी माणसांच्या नेहमीच्या वापरातला ड्रेस अंगावर चढवला, बॅग उचलली व जवळचा रेल्वे स्टेशनचा रस्ता सुधारला.

इडीचॅपमनला इंग्लंडला–पाठवताना जर्मन हेरखात्याने इंग्लंडमधील एकाही जर्मन हेराचा पत्ता दिला नव्हता. एका इंग्रजावर तेवढा विश्वास टाकायला जर्मन हेरखाते तयार नव्हते! "तुमचे काम तुम्हाला एकट्यानेच पार पाडावे लागेल. पण इंग्लंडमध्ये उतरल्यापासून तुमच्यावर आमची सक्त नजर राहील. जर फितुरीचा प्रयत्न केला तर तुमची चटणी उडवली जाईल" ही जाणीव देऊनच इडीची जर्मनीतून रवानगी करण्यात आली होती. ही धमकी पोकळ नाही याची चॅपमनला पूर्ण जाणीव होती. ती जाणीव मनात ठेवूनच तो गाडीतून लिव्हरपूल स्टेशनवर उतरला. सकाळचे वेळी कामावर निघालेल्या लोकांची गर्दी स्टेशनवर झाली होती. तिचा फायदा घेऊन तो एका टेलिफोन बूथमध्ये शिरला. बूथचे दार त्याने घट्ट लावून घेतले. फोनची तबकडी फिरवताना कोणता नंबर लावतोय हे कुणाला दिसू नये याची खबरदारी घेणे हा तर त्याचा स्वभावच बनला होता. गुन्हेगार जगतात ती गोष्ट अगदी आवश्यकच असते. त्यामुळे बूथबाहेरून चॅपमनवर पाळत असल्यास त्या इसमाला चॅपमनने कुणाला फोन केला हे कळणे शक्यच नव्हते. थोड्याच

# चोरांचा राजा

वेळात त्याने लावलेल्या नंबरने फोन उचलला, "ब्रिटिश युद्धखाते" तिकडून आवाज आला. माऊथपोलमध्ये तोंड खुपसून हळू पण स्पष्ट आवाजात तो म्हणाला, "कोण बोलतय, मला हेरखात्याच्या महत्त्वाच्या अधिकाऱ्याशी बोलायचय. राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे काम आहे."

पलीकडच्या व्यक्तीने जास्त चौकशीत वेळ न घालवता फोन जोडून दिला. फोनवरून हेरखात्याचा बडा अधिकारी बोलतोय याची खात्री होताच इडीचॅपमन म्हणाला, "मी इडीचॅपमन लिव्हरपूलहून बोलतोय"

इडीचॅपमनची कीर्ती व गुन्हेगार जगतातील स्थान माहीत असलेला तो अधिकारी चकितच झाला.

इडीचॅपमन हा ब्रिटीश कोर्टाने शिक्षा दिलेला एक गुन्हेगार होता. लिव्हरपूलमधून तो बोलत होता. त्याचा पत्ता काढणे सहज शक्य होते. त्याला पकडून त्याच्यावरील शिक्षेची अंमलबजावणी करणे हे सरकारचे कर्तव्ये होते. त्या अधिकाऱ्याने इडीला तो लिव्हरपूलला कसा आला व त्याने फोन का केला याबद्दल विचारले. फोनवर इडीने थोडक्यात माहिती दिली. त्या अधिकाऱ्याने हेरखात्याचा एक अधिकारी चॅपमनच्या भेटीला गुप्तपणे पाठविण्याचे कबूल केले. तो अधिकारी चॅपमनची हकीगत प्रथम पडताळून पाहाणार होता. अशी बनवाबनवी करणे इडीच्या तळहातचा मळ आहे ही गोष्ट ब्रिटिश हेरखाते जाणून होते. पण राष्ट्र जीवनमरणाच्या लढाईत गुंतले होते. जर इडीची हकीगत खरी असेल तर जर्मनीवर प्रतिहेर म्हणून त्याचा उपयोग करणे शक्य होते. समक्ष भेट घऊनच या बाबत निर्णय घेणे योग्य होते. त्याला तुरुंगात काय केव्हाही डांबणे शक्य होते. भेट घेऊन त्याला पकडायचे ठरले तरी तेही काम सुलभच होणार होते. या सर्व बाबींचा विचार करून योग्य निर्णय घेऊ शकेल असा मोठा अधिकारी चोराच्या राजाची गुप्त भेट घेण्यासाठी लिव्हरपूलला आला.

भेटीचे वेळी चॅपमनने दडवलेली पॅरॅशूट व जर्मनांनी दिलेले हेरगिरीचे साहित्य दाखवून आपण थापा मारीत नाही हे सिद्ध केले. गुन्हेगारीबद्दल त्याला तुरुंगात डांबण्यापेक्षा प्रतिहेर म्हणून त्याचा वापर करणे इंग्लंडच्या जास्त हिताचे आहे असे आढळून येताच त्याचा प्रतिहेर म्हणून वापर करावयाचे ठरले.

प्रतिहेर म्हणून त्याचा वापर करतानाही ब्रिटिश हेरखाते त्याला आपला म्हणणार नव्हते. कोणत्याही परिस्थितीत त्याचा आपला संबंध ब्रिटिश हेरखाते मान्य करणार नव्हते. जर तो पकडला गेला तर हेरगिरीचे आरोपाबद्दल त्याचेवर खटला होणार होता. मात्र त्याच्या मागील सर्व शिक्षा त्याला माफ करण्यात येणार होत्या. त्या मोबदल्यात त्याने जर्मनांनी त्याच्यावर सोपवलेले काम ब्रिटिश हेरखात्याच्या सूचनेप्रमाणे करावयाचे होते. त्या कामाच्या मोबदल्यात जर्मनीकडून त्याला मिळणारा मोबदला ठेवण्यास त्याला परवानगी होती. पण ब्रिटिश सरकार त्याला कोणताही पगार देणार नव्हते. थोडक्यात म्हणजे इडीचॅपमनने जर्मनीचा पगार घेऊन जर्मन हेर म्हणून ब्रिटिश हेरखात्याची चाकरी करावयाची होती. त्याच्यासारखा चोरांचा राजा ब्रिटिश हेरखाते फक्त याच अटीवर समावून घेण्यास तयार होते. इडीचॅपमनने या अटी मान्य केल्या.

इडी चॅपमनने मग आडबाजूला एक खोली भाड्याने मिळवली व तेथे आपला ट्रॅन्समीटर लाऊन जर्मनीशी सपर्क साधला. जर्मन हेर खात्याने त्याला ब्रिटिश बेटातील विमान विरोधी तोफाच्या बातम्या, ब्रिटिश लष्करी तळ वगैरे बद्दलची माहिती काढून कळविण्यास फर्मावले. जर्मनाना खरी वाटेल, पण तरीही त्याची पुरेशी दिशाभूल होऊन आपले फारसे नुकसान होणार नाही अशा प्रकारे ही सर्व तपशीलवार माहिती ब्रिटिश हेरखाते चॅपमनला देत असे व चॅपमन ती जर्मनीला पुरवीत असे जर्मन हेरखाते चॅपमनचा या हेरगिरीसाठी वापर करीत असे तरी त्याचे मुख्य काम मॉस्कीटो बॉम्बर कारखान्यात घातपात घडवून तो कारखाना बद पाडणे हे होते. तो जर या कामात अपयशी ठरला तर त्याचे ऐवजी दुसऱ्या एखाद्या निष्णात हेराची या कामासाठी जर्मनी योजना करण्याची शक्यता होती. युद्ध चालू असताना बॉम्बर विमानाचा कारखाना क्षणभरही बद पडणे ब्रिटनला परवडण्यासारखे नव्हते. त्यामुळे जर्मनाना चकवायचा बेत ब्रिटिश हेरखात्याने आखला. त्यासाठी त्यानी मॉक्विटो बॉम्बर विमानाचा कारखाना कॉमोफ्लेजने दडविण्यात आला. पण त्याच्याच शेजारी विमानातून पहाणाऱ्याला अगदी हुबेहूब तसाच वाटेल अशी एक त्याच कारखान्याची प्रतिकृती उभारण्यात आली. मग चॅपमनने ती बोगस फॅक्टरी उडवून दिली. व काम फत्ते, मॉस्कीटो बॉम्बर कारखाना बद पाडला असा सदेश जर्मनीला वायरलेसवरून कळवला. तावडतोब प्रत्युत्तर आले, 'अभिनदन'

मग जर्मन विमानांनी त्या कारखान्याची कसून पहाणी केली. अगदी तपशीलवार हवाई फोटोग्राफी करण्याचे तत्र जर्मनानी चागले आत्मसात केले होते. अशा पहाणीत ही बनवाबनवी उघडकीला येण्याची चांगलीच शक्यता होती ही कामगिरी पार पाडल्यावर बरेच दिवस चॅपमनला जर्मनानी कोणताच सदेश दिला नाही. रोज ठरल्या वेळी तो जर्मनीशी सपर्क साधी पण जर्मनीकडून कोणताच सदेश येत नसे की त्याला कोणते नवे कामही सागण्यात येत नसे. जस जसे दिवस जाऊ लागले तसतसे चॅपमनला वाटू लागले, आपले पितळ नक्कीच उघडे पडले. जर्मन हेर खात्याचे लक्षात आपली बनवाबनवी आलेली आहे. आता एक दिवस जर्मन हेरखाते आपला मुडदा पाडणार. तो खोलीबाहेर पडायला घाबरू लागला. गुन्हेगार जगतातला तो दादा दारावर टकटक झाले की घाबरू लागला. त्याला वाटायचे की आला आपला काळ. असेही अनेक दिवस गेले. मग एक दिवस वायरलेसवर सदेश आला, 'तावडतोब लिस्बनला जाणारी बोट पकडा. तेथे 'क्ष' ला भेटा तो तुमची जर्मनीत परत येण्याची सोय करील!'

'काय करावे?' इडी चॅपमनला प्रश्न पडला. जर्मनीत परत गेल्यावर आपले काय होईल? याचा काहीच अदाज त्याला येईना. जर त्याचा डाव सफल होऊन जर्मनी बनला असेल तर त्याला जर्मनीत जाऊन त्याचे दहा हजार पौंड मिळणार होते. पण जर का त्याचा डाव जर्मनाचे लक्षात आला असेल तर त्याचे हाल कुत्रा खाणार नव्हता. पण त्या परिस्थितीत इग्लडमध्येही तो फारसा सुरक्षित नव्हताच. आत्तापर्यंतचे त्याचे आयुष्य गुन्हेगार जगतातच गेले होते. गुन्हेगार जगतातील दादा म्हणून त्याचे जीवीत नेहमीच धोक्यात असे. पैसा पाहिजे तर धोका पत्करलाच पाहिजे हे त्याचे रक्तात मुरले होते. त्याने जर्मन हेरखात्याचा आदेश मानून परत जर्मनीत जाण्याचा बेत पक्का केला व टेलिफोनवरून ब्रिटिश हेरखात्याला त्याप्रमाणे कळवले. 'बेस्ट ऑफ लक!' टेलिफोनवर भारावलेला आवाज आला. जर्मनीत त्याचा छळ होण्याची व प्रसगी तो मारला जाण्याची शक्यता ब्रिटिश हेरखात्याला दिसत होती. जर्मन हेरखात्याला बनवणे सोपे नाही याची ब्रिटिश हेरखात्याला जाणीव होती वास्तवीक पहाता चॅपमन हा एक अट्टल गुन्हेगार होता जर्मनानी त्याचा बदोबस्त केला तरी त्यातही इग्लडचा फायदाच होता शाततेच्या काळात चॅपमनचा बदोबस्त करण्यासाठी ब्रिटिश पोलिसानी जर्मन पोलिसाची मदत मागितली असती. पण लढाई चालू होती. आपल्या धदेवाईक नैपुण्याने इडी चॅपमनने जर्मनाना बनवावे व तो जिवत रहावा अशी ब्रिटिश हेरखात्याची इच्छा होती. कारण त्यातच इग्लडचे हीत होते.

चॅपमन जर्मनीत पोचला तेव्हा त्याचे स्वागत तर चागले झाले! त्याला त्याचे कामगिरीचा तपशीलवार अहवाल लिहून देण्यास सागितले गेले. त्याचेबरोबर जोडिदार म्हणून एक जर्मन हेर सतत पाळत ठेऊन होता. मानसशास्त्रज्ञापासून हेरखात्यातील वेगवेगळ्या दर्जाचे वरिष्ट अधिकाऱ्यापर्यंत अनेकानी इडी चॅपमनची उलटतपासणी घेऊन प्रत्येकाने चॅपमनकडून स्वतत्रपणे अहवाल लिहून घेतला. पण बदमाशीत मुरलेल्या चॅपमनला त्या सर्वांना बनवण्यात यश आले, त्यामुळे इडी चॅपमनला ठरलेले बक्षिसाचे दहा हजार पौंड तर मिळालेच, पण वर आयर्नक्रॉस हे जर्मन लष्करी सेवेतील अत्युच्च सन्मानाचे पदकही देण्यात आले.

त्या मानसन्मानात थोडे दिवस गेले. मग एक दिवस चॅपमनला त्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यानी पुन्हा बोलावले. 'एका नवीन यत्राचे योगे ब्रिटिश आमच्या पाणबुड्याचा समुद्रातच धुव्वा उडवीत आहेत. त्या यत्राचा तपशील तुम्ही काढू शकाल का?' त्यानी विचारले.

'प्रयत्न केला तर जमेल असे वाटते. पण खर्च फार येईल. त्यासाठी मी निदान पन्नास हजार पौंड किंवा पाच लाख मार्क घेईन' चॅपमनने आपला भाव वाढविला

'काय वेड लागलय का काय? इतकी किंमत कोण देईल.' त्या अधिकाऱ्याने दम देण्याचा प्रयत्न करीत म्हटले पण असल्या दमबाजीला चॅपमन थोडीच दाद देणार. त्यावेळी दोस्तानी दुसरी आघाडी उघडली होती. बोटी भरभरून युद्धसाहित्य अॅटलाटीक ओलाडून अमेरिकेतून युरोपात येत होते. ती जहाजे बुडवून त्यावरील साहित्य व सैनिक समुद्रात बुडवणे हाच जर्मन विजयाचा मार्ग होता. जर्मन पाणबुड्या तशा पराक्रमी होत्या पण ब्रिटिशांच्या या गुप्त यत्रापासून त्याना अभय पाहिजे होते. त्यामुळे दमबाजी व घासाघीस करून चॅपमन बधत नाही हे पाहून जर्मनानी शेवटी चॅपमनची मागणी मजूर केली व इग्लडमध्ये उतरण्यासाठी तो जर्मन विमानात चढला.

मागील खेपेला विमानातून बाहेर उडी टाकल्यावर ब्रिटीश विमानवेधी तोफानी त्याचे स्वागत केले होते. पण ह्या वेळपर्यंत इंग्लडचे हवाई सरक्षणसामर्थ्य चांगलेच वाढले होते. विमानांना ब्रिटीश फायटर विमानानी खाडीवर गाठले. पण त्याचा विमान चालक

कसलेला वैमानिक होता. आपले सर्व कसब पणाला लावून त्याने हवेतच आट्यापाट्या व सुरपारंब्याचा खेळ सुरू करून ब्रिटीश विमानांना झुकाडी दिली व एकदाचे चॅपमनचे मोटले इग्लडचे भूमीवर टाकले; व तो सुखरूपपणे जर्मनीला परत आला. वैमानिक सुखरूप जर्मनीला परत गेला. पण चॅपमनचा मागचा पाठलाग सुटला नाही. इंग्लडची नागरी संरक्षण यंत्रणा पण जास्त कार्यक्षम झाली होती. पॅरॅशूटमधून त्याचे पाय जमिनीवर टेकले तोच त्याच्या दिशेने बॅटरीचे झोत टाकले जाऊ लागले. त्याच्या दिशेने कुत्री भुकत येऊ लागली. चॅपमनला ब्रह्माड आठवले. कुत्र्यांचे तोडातून सुटका झाली तर नागरीसरक्षक गोळी घालणार. एकूण मरण टळणार नाही असे त्याला दिसू लागले. अशा प्रसगी ब्रिटीश हेरखाते त्याला आपला म्हणणार नव्हते हे तर आधीच ठरून गेले होते. जिवाच्या कराराने झाडोऱ्याचे आडोशाने ओणवा होऊन तो धावत सुटला. कुत्र्याचा भुंकण्याचा आवाज दूर पडू लागला. आगगाडीच्या शिट्टीचा आवाज त्याच्या कानावर आला. रेल्वे स्टेशन जवळ आले होते. समोर उभ्या असलेल्या गाडीत चॅपमनने उडी टाकली. गाडी सुरू झाली व त्याचा जिवात जीव आला. रात्रीची वेळ असल्याने स्टेशनवर अगर गाडीत फारशी वर्दळ नव्हती. त्याच्याकडे कुणाचेच लक्ष गेले नाही. दुसऱ्या दिवशी एका गर्दीच्या स्टेशनवरील टेलिफोन बूथमधून चॅपमनने ब्रिटीश हेरखात्याला फोन केला. फोनवर त्याचा आवाज ऐकताच पलिकडच्या माणसाला आनदाश्चर्याचा धक्का बसला. थांबा! बॉसशीच बोल असे म्हणून त्याने हेरखात्याचे प्रमुखालाच फोन जोडून दिला. ब्रिटीश हेरखात्याच्या प्रमुखाने सुखरूप परत आल्याबद्दल चोरांच्या राजाचे खास अभिनदन केले. चॅपमनवर जर्मनानी सोपवलेले काम ऐकून आपल्या पाणबुडी नाशक यंत्राच्या यशस्वितेबद्दल ब्रिटीशांना पावतीच मिळाली. जर्मनांनी यावेळी नुकतीच व्ही टू या रॉकेटचा मारा इग्लडवर सुरू केला होता. रॉकेट बरोबर लक्षावर पडतात का हे माहिती होणे त्याना आवश्यक होते. त्याप्रमाणे पुढील कामगिरी ते करू शकणार होते. त्यानी चॅपमनला ही माहिती पाठवण्याचा आदेश दिला. ब्रिटीश हेरखात्याचे काम सुरू झाले. त्यानी ही माहिती अशा प्रकारे बदल करून जर्मनाना चॅपमन मार्फत पोचवली की पुढील सर्व जर्मन रॉकेटसचा मारा गजबलेल्या मध्य लडन ऐवजी तुरळक वस्तीच्या उपनगरावर झाला त्यामुळे इग्लडचे फारसे नुकसान झाले नाही. परिणामी जर्मनीच्या या नव्या अस्त्राचा अपेक्षित फायदा जर्मनाना मिळाला नाही.

त्यानतर लढाई लवकरच सपली. जर्मन हेरखात्याकडून पन्नास हजार पौड चॅपमन मिळवू शकला नाही: पण त्याची चॅपमनला फिकीर नव्हती. ते त्याच्या एका रात्रीचे सुद्धा काम नव्हते. ब्रिटिश सरकारने कबूल केल्याप्रमाणे त्याच्या मागील सर्व शिक्षा माफ केल्या होत्या. मोठ्या रुबाबाने चॅपमनने पुन्हा लडनचे गुन्हेगारजगतात प्रवेश केला. पण त्याच्याकडे कुणी ढुकूनही पाहीना. युद्धपूर्व गुन्हेगारांचा राजा गुन्हेगार जगताने संपूर्ण वाळीत टाकला होता. त्याचे जवळसुद्धा कुणी यायला कबूल नव्हते. कारण त्याने जर्मन हेरखात्याच्या वतीने युद्धात इग्लडमध्ये हेरगिरी केली होती ही गोष्ट गुन्हेगार जगताला माहीत होती. हे गैरसमज दूर व्हावेत व थोडाफार पैसा मिळावा म्हणून चॅपमनने एका वृत्तसस्थेला आपले हेरगिरीचे अनुभव प्रसिद्धीला दिले. पहिला हप्ता प्रसिद्ध झाला. लगेच शासकीय गुप्ततेचा भंग केला म्हणून चॅपमनवर ब्रिटिश हेरखात्याने वॉरंट बजावले. त्याच्यावर खटला भरला व चॅपमनला दडाची शिक्षा झाली. ब्रिटिश हेरखात्याने एका दगडात दोन पक्षी मारले. जर्मन हेरखात्याला तर बनवलेच, पण चॅपमनसारख्या चोराच्या राजाचे गुन्हेगार जगतातून उच्चाटनही केले.

□ □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

ब. मो. पुरंदरे — किंमत सात रुपये — राजहंस प्रकाशन

## डालडा उत्पादन थंडावले : पृष्ठ ७ वरून

भरमसाठ चढउताराचा अर्थातच मोठा परिणाम त्यायुळे वनस्पतीच्या किंमतीवर, उत्पादनावर होतो...

' ह्या सान्यातून चमत्कारिक विरोधाभास आज उभे राहात आहेत. वनस्पती उत्पादनात भुईमुगाच्या तेलात, ३५ ते ४०% पर्यंत आयात केलेले सोयाबीन किंवा पाम तेल वापरले जाई त्याची किंमत ३५०० ते ४००० रु असायची. त्यामुळे आजचा भाव परवडायचा. तेलाची बाजारातली किंमत ८ ते ९ रुपये आणि डालड्याची अधिकृत किंमत ६॥ ते ७ रुपये असा प्रकार घडायचा. ह्यातून डालड्याची मागणी अनपेक्षितपणे वाढते काळा बाजार सुरू होतो गिऱ्हाइकाना वाजवी भावात डालडा मिळतच नाही. त्यातून पुन्हा तेलाचे भाव वाढतात वनस्पती अदृष्य होते. भाव वाढतात. हे चक्र चालूच राहाते....

ह्या सदर्भात मुंबईच्या फोरम ऑफ फ्री एन्टरप्राईजचे श्री. एम. आर. पै ह्यानी असा उघड आरोप केला, की ' ह्या सान्या गोंधळात त्यातून उद्भवणाऱ्या काळ्याबाजारात सरकारचा, सत्ताधारी पक्षातल्या लोकाचा व्हेस्टेड इंटरेस्ट असतो, आहे. तेवढ्यासाठी त्याना नियंत्रण हवे आहे. त्यातून भेसळ, काळाबाजार, स्मगलिंग ह्या प्रकाराना वाव मिळतो. त्यात त्याचा प्रिमियम असतो. त्या प्रिमियमचे प्रमाण फार मोठे असते. ४०% पर्यंत You will not believe. पण डालड्याचे आज मोठ्या प्रमाणावर स्मगलिंग चालू आहे. त्यातही पद्धतशीर हात ह्या सान्याचे पोचले आहेत... वनस्पतीचे नाही, प्रत्येक क्षेत्रात आज हे सुरू आहे. गहू नियंत्रणात अनेकानी आपले उखळ पाढरे करून घेतले आहे. केंद्र सरकारच्या आजच्या निर्नियत्रणाच्या धोरणाला राज्य–जिल्हा पातळीवर आज विरोध होत आहे तो ह्यामुळेच... कुठलेही नियंत्रण म्हणजे व्हेस्टेड इंटरेस्ट्स आलेच. आजच्या सान्या खेळखंडोब्याला सरकारच कारणीभूत आहे...'

श्री. पै व डॉ. छत्रपती दोघानीही ह्या प्रश्नावरचा एकमात्र तोडगा सागितला तो म्हणजे निर्नियत्रणाचा ! '... त्यामुळे काही दिवस किंमती वाढतीलही. १४–१५ रुपये किलोवर त्या स्थिरावतीलही. आजही डालडा जनतेला काळ्या बाजारात उपलब्ध होतो आहे तो ह्याच भावात. नियंत्रणे आवळली तर काळ्याबाजारात तो भाव आणखीन भडकेल. नियंत्रणे उठवली तर निदान त्या पातळीवर तो स्थिरावेल. त्यामुळे सरकारी गंगाजळीत भर पडेल. काळ्याबाजारवाल्याना पैसा मिळण्यापेक्षा सरकारी तिजोरी फुगली तर जनतेच्या दृष्टीने ते योग्यच होईल. शिवाय शेतकऱ्यांना भाव चागले मिळतील. उत्पादन वाढेल. उत्पादन वाढले की भडकलेले भाव आपोआप खाली येतील. आजची तगी कमी होईल...'

वनस्पती उत्पादकाचे बरेचसे म्हणणे आकडेवारीने समजून घेता येईल. ती शेजारी उद्धृत केली आहे. त्यामुळे एकूण प्रश्नाची आज तड लावायची असेल तर तेलाच्या किंमतीना आळा घातला गेला पाहिजे असे मला वाटते. '...भुईमूग आणि तेलाच्या किंमतीमध्ये चार ते पाच रुपयांचा फरक आहे. हा अवाजवी वाटतो. तेलापासून वनस्पतीचे उत्पादन करताना साधारणत. २०% खर्च येतो. तेलाच्या किंमतीच्या सदर्भात म्हणजे, आजच्या भुईमुगाच्या किंमती लक्षात घेता, तेल ५॥–६ रुपयाच्या घरात व नतर डालडा ७॥–८ रुपयाच्या घरात गिऱ्हाईकाना उपलब्ध व्हायला हरकत नाही असे मत हिंदुस्थान लिव्हरमधल्या एका तंत्रज्ञाने व्यक्त केले. ह्या तंत्रज्ञाने इतरही बऱ्याच गोष्टी सागून टाकल्या, तेलाच्या किंमतीवर सारे अवलबून असले, तरी ह्या उत्पादनाच्या प्रकरणात एवढे गैरव्यवहार करून उत्पादन खर्च कमी केला जातो की उत्पादक सघाचा दावा काही वेळा फोल वाटतो. वनस्पती उत्पादनात तेलावर प्रक्रिया केली जाते. भुईमूग ९५% व तिळाचे तेल ५% आणि व्हिटॅमिन्स अ आणि ड ह्याचे डीहायड्रेटेड मिश्रण म्हणजे डालडा. डालड्याचा हा मूलभूत फॉर्म्युला १९६५ मध्ये मजूर झालेला. आज तो कुठेच अस्तित्वात नाही. तिळाचे तेल वनस्पतीतून अदृष्यच झाले आहे. त्या ऐवजी सोयाबीन, पाम, कपाशी, अळशी, करडई, मोहरी वगैरे तेलाचा वापर सुरू झाला आहे. तोही ३५ ते ४०% च्या घरात. हे सारे शासनाच्या समतीनेच होत आहे. ह्याही खेरीज आडमार्गाने आणखीनही काही चीपनर्स मिसळले जातात. ह्यातल्या कशाचाच पत्ता गिऱ्हाईकाना नसतो. डब्यावर ' मूंगफलीका जमाया हुआ शुद्ध तेल ' हे लेबलही कायम असते. १९६५ पासून गेल्या वर्षापर्यंत भुईमुगाच्या तेलाच्या किंमती वनस्पती तेलाहून कमी असून देखील हे चालूच होते. त्यातून उत्पादकाचा फायदा वाढत होताच. '

ह्या शिवाय प्रॉडक्ट्स आहेतच. डीहायड्रोजनेशन करताना ऑक्सिजनही तयार होत असतो. तो वनस्पती उत्पादकाना जवळ जवळ फुकट मिळतो. पण गावात त्याची किंमत ऑक्सिजन उत्पादन करणाऱ्या कारखान्याइतकीच आकारली जाते. इथे वनस्पती उत्पादकाना मोठा फायदा होतो. हीच कथा 'सोपस्टर' ह्या दुसऱ्या उपउत्पादनाची ! रिफाईन्ड तेल तयार करताना, फॅट्स वगैरे पदार्थांचा गाळ शिल्लक राहतो. हा एरवी टाकाऊच असतो त्यात काही क्षुल्लक किंमतीचे रसायन टाकून आणि वर भरपूर पाणी मिसळून हा 'सोपस्टर' तयार केला जातो. भरपूर किंमतीला साबणाच्या कारखान्याना विकला जातो. अक्षरश पाण्यातून हा पैसा उभा राहतो. मटन टॅलो हे आणखी एक पैसा मिळवून देणारे इथले उत्पादन. प्रायः कापड गिरण्यातून वापरले जाणारे. हे उत्पादन जवळ जवळ वनस्पती सारखेच, पण जास्त विलयन बिंदू (Boiling Point) असलेले. डालड्यात न खपणाऱ्या इम्प्युरिटीज (अशुद्ध तत्त्वे) असलेले. पण डालड्यापेक्षा चढ्या भावात खपणारे. डालड्याचे उत्पादन कमी करून मटन टॅलोचे उत्पादन वाढवण्याकडे उत्पादकाचा अलिकडे कल दिसतो तो ह्यामुळेच...

'...वनस्पतीची किंमत निश्चित करण्यासाठी शासनाने काही सूत्र घालून दिलेले आहे. त्याचा हवाला देऊन आपण धदा तोट्यात कसा चालवतो ते दाखवायचा खटाटोप उत्पादकाचा चालू असतो. पण हा फॉर्म्युलाच मुळात चुकीचा आहे. डिप्रिसिएशन, स्टॉक्स असले तरी चालू बाजारभावाप्रमाणे कच्च्या मालाची किंमत गृहीत धरणे वगैरे प्रकारामुळे खर्च फार फुगवून दाखवला जातो. आज तेलाचे भाव कडाडले असले, तरी वरील सर्व कारणामुळे आजही हा धदा बुडीत आहे असे मी मानायला तयार नाही. तरीपण, तेला-

वर प्राय: अवलंबून असलेल्या ह्या धंद्यात, वनस्पतीप्रमाणेच तेलांच्या किंमतीवरही नियत्रण यावे हे मात्र मलाही पटते. कारण त्यामुळे डालडयाचे भाव आणखी खाली आणता येतील...'

हिंदुस्थान लिव्हरमधल्या, डावीकडे झुकलेल्या एका तत्रज्ञाचे हे अनुभवावर आधारलेले विचार. त्याने चक्क गणितच माडून दाखवले. वर उल्लेखिलेले सर्व मुद्दे पायरीपायरीने विचारात घेऊन त्याने हिशेब माडले. तेलाच्या किंमतीपेक्षा सुमारे एक रुपया कमी किंमतीत डालडा देता यावा, किमान तेलाएवढचा किंमतीला द्यायला तरी काहीच हरकत नाही हे त्याच्या गणिताचे सार. वनस्पती उत्पादक सघाचे डॉ. छत्रपती ह्याच्यापुढे मी हे गणित माडले तेव्हा ते उसळून म्हणाले, 'This is all humbuck ? हे सर्व कपोलकल्पित आहे. वर उल्लेखलेले सर्व मुद्दे ह्यापूर्वीच विचारात घेतलेले आहेत. त्यात नवीन काहीच नाही. टॅरिफ कमिशनने डालडयाचे भाव बाधून दिले तेव्हा, हे सारे घटक लक्षात घेऊन, त्यातून मिळणाऱ्या फायद्यानुसार डालडयाच्या किंमती आधीच कमी केलेल्या आहेत. एवढेच नाही तर, प्रत्यक्ष पाहणीत असेही आढळून आले की, 'सोपस्टर'साठी वापरल्या जाणाऱ्या गाळाबरोबर चागले तेलही मोठ्या प्रमाणावर जाते. ५ ते १० टक्के इतक्या प्रमाणातही. तर सरकार भाव धोरण आखताना हे नुकसान केवळ अर्धा टक्काच गृहीत धरते. तेव्हा फायदा, तोही गडगज हे तर राहुद्याच पण उत्पादकांना तोटाच सहन करावा लागतो...'


हे सारे चर्वितचर्वण झाल्यावर, एक गोष्ट मनाला पटली उत्पादकाविषयी फारशी सहानुभूती नाही. कमवायच्या काळात जनतेची फिकीर न करता त्यानी कमावले हिंदुस्थान लिव्हरच्या तत्रज्ञाच्या म्हणण्यात बरेच तथ्यही आहे. अहमद मिल्समधल्या एका आणखी तत्रज्ञानेही त्याला पुष्टी दिली आहे. एवढे असले, तरी एकूण आकडेवारी पाहाता, तत्र अभ्यासता, उत्पादकाच्या आजच्या दाव्यातही तथ्य आहे असे मला वाटते. किलोमागे अडीच रुपये वाढीची मागणी कदाचित अवास्तव ठरावी पण आजच्या परिस्थितीत उत्पादन खर्च उत्पन्नापेक्षा वाढला असावा असे मानायला जागा आहे. आणि ह्याची बरीचशी जबाबदारी भडकत्या तेल किंमतीवर आहे. त्या रोखण्यात अपयशी ठरलेल्या सरकारवर आहे.

म्हणूनच मी आपला मोर्चा तेल व्यापारी सघटनेकडे वळवला. पण तिथे चक्क कानावर हात ठेवले गेले. एकाने स्पष्टपणे सागून (भुत्ता हे त्याचे नाव!) टाकले. 'तेलाच्या नाड्या सगळ्या सौराष्ट्राच्या हातात आहेत. तिथून मिळतो तो भाव आम्ही लावतो. तिथून माल घ्यायचा आणि तिथून मिळणाऱ्या भावापेक्षा कमी भावात तो इथे द्यायचा हे परवडणारे नाही...' श्री. नाडकर्णी हे गुजराथेतल्या तेल व्यवसायात काहीसे स्थिरावलेले. ह्या ओघात अनपेक्षितपणे मुबईत भेटले '...भुईमुगाची निर्यात आणि त्याचे स्मगलिंग ह्यामुळे तेलगिरण्यापुढे सकट आहे. त्यामुळे मिळणारा भुईमूग जास्त भावात घ्यावा लागतो. बँकेची अडवणूक आहेच. त्यामुळे तेलाचे उत्पादन मदावते. भाव वाढवावे लागतात....'

पुण्यात पानशेत प्रकरणात गाजलेले मे. ग. स. ठोसर ह्यानी ह्यावर बरेच सशोधन केले आहे. सप्रमाण त्यानी असे दाखवून दिले आहे की, आजही भुईमूग तेलाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवून तीन-चार रुपये किलोपर्यंत बाजारात विक्रीला देता येईल. ह्या उपक्रमाचा निर्देश करून श्री. नाडकर्णी पुढे म्हणाले, '...पण सरकार अशा प्रयोगाच्या बाबतीत निरुत्साही धोरण आखते. तेलाचे आणखी प्रकार वास्तवात शोधून काढण्यासाठी सरकारने पुढे यायला हवे. तादळाचा सड, निंबोण्या, काही मुबलक प्रमाणात आढळणाऱ्या हिरव्या वनस्पती ह्याच्यापासून तेल मिळवण्याचा प्रयत्न सरकारने करायला हवा होता. २३ वर्षे पी. एल. ४८० खाली सरकार धान्य आयात करीत असताना असले सशोधन करायला वाव होता. पण सरकारने ते केले नाही. उलट उत्पादन दिवसेदिवस कमी होत गेले. पोलाद वगैरेच्या मागे सरकार नुसते लागत राहिले. परिणामत आज आम्ही अणुशक्तीच्या बाबतीत स्वावलबी होत आहोत आणि त्या बदल्यात, अन्नधान्यासाठी देश लिलावात काढू पाहात आहोत...'

श्री. नाडकर्णींच्या ह्या मताशी मात्र डावे-उजवे सगळे सहमत झाले. पण हे सर्वांचे एकमत झाले, तरी त्यामुळे आजच्या प्रश्नावर लगेचचा उतारा मिळत नाही. तत्रज्ञाचे म्हणणे मान्य करून उत्पादकांचा दावा अमान्य केला तरी तो स्वतत्रपणे, नि पक्ष व टेक्निकल पार्श्वभूमी असलेल्याची समिती नेमून, सशोधून घ्यायचा विषय आहे म्हणजेही कालहरणच. तूर्तास तरी, उत्पादकानी माडलेले हिशेब सरकारी तत्र पाहूनच माडलेले असल्याने ते मान्य करण्यावाचून गत्यतर नाही. आणि ते मान्य केल्यास त्याच्या मागणीत तथ्य आहे हेही निश्चित. तेव्हा आजच्या घटकेला वेगळा मार्ग अनुसरावा लागेल हे निश्चित. उत्पादक सुचवतात तसला निर्नियत्रणाचा मार्ग तूर्त चोखाळता येईल असे वाटत नाही. कारण तसे झाले तर काळ्या बाजारातल्या किंमतीच राजमान्यता पावून स्थिरावतील. गरीब भारताला त्या परवडणार नाहीत. तेव्हा तेलावर नवीन नियत्रणे लादायची आणि तेल व वनस्पती ह्याच्यावरील नियत्रणाची काटेकोर, निष्ठूर अमलबजावणी करायची हाच एकमात्र उपाय शिल्लक राहातो. सद्य.स्थितीत, तेलाची आयात करून वनस्पतीची भावपातळी राखता येईल हे शक्य वाटत नाही तेव्हा स्थानिक तेलावर निर्बंध लादून तेलाची व वनस्पतीची भावपातळी स्थिरावणे हाच एकमात्र उपाय आहे. त्यासाठी, नियत्रणामुळे फोफावणाऱ्या काळ्या बाजाराविरुद्ध, स्मगलिंगविरुद्ध, भेसळीविरुद्ध कठोर धोरण सरकारला अवलबाव लागेल त्याबरोबरच वनस्पती उत्पादक व बडे व्यापारी ह्याच्या विरुद्धही ठाम भूमिका घेऊन सरकारला उभे राहावे लागेल. रेल्वे कामगाराच्या सपात कणखर भूमिका घेऊन सरकार त्या भूमिकेवर ठामपणे उभे राहिले तेल उत्पादक, तेल व्यापारी आणि वनस्पती उत्पादक ह्यानी पुकारलेल्या सपसदृष आदोलना विरुद्धही सरकार त्याच जिद्दीने उभे राहते का तेच आता पाह्याचे आहे. तसे उभे राहून काळाबाजार, स्मगलिंग, भेसळ ह्या विरुद्धही युद्ध पातळीवर आघाडी उघडली तर ह्या जिद्दीला खरा अर्थ येईल. भावपातळी राखता येईल. रेल्वे कामगाराविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या इदिरा सरकारला हे अवघड वाटू नये! तसे झाले, तर अण्वस्त्र स्फोटाचे झाले तसेच उत्स्फूर्त स्वागत, सरकारच्या ठाम धोरणाचे होईल ह्यात वाद नाही!!

□ □


THERE'S A BEAUTIFUL DESTINY IN STORE FOR YOU...
SAREES...SHIRTINGS...SUITINGS.
VISHNU
GROUP ENTERPRIS
LINTAS-LV. 13-140

। । । नजर । । ह. शि. खरात । ।

# । । । टच । । । ।

## बर्गमनचा फक्त स्पर्शच – आत्मा नाही.

इंगमार बर्गमन हा प्रतिभावान स्वीडिश दिग्दर्शक. बर्गमन आपल्या चित्रपटातून जीवनाचा 'फॉर्म' शोधण्याचा प्रयत्न करतो. तपशीलातून विश्वाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करतो. आपल्या सृजनशील प्रतिभेतून तो कॅमेऱ्याच्या साहाय्याने अशा काही प्रतिमा निर्माण करतो की अमूर्त अनुभव जिवंतपणे आपल्या समोर उभा राहतो. कादंबरीकार आपल्या शब्दमाध्यमातून जो इष्ट परिणाम वाचकावर करतो अगदी तेच काम बर्गमन आपल्या चित्रपटाने करतो. इंगमारचा चित्रपट म्हणजे एक दृश्य कादंबरी असते. म्हणूनच की काय बर्गमन कथा-पटकथा ह्यांच्या जंजाळात बहुधा कधीच पडत नाही. एक एक अनुभव तो असा काही टिपतो की सर्व दृश्य-अनुभवांचा एकच एक असा परिणाम होतो. बर्गमनच्या चित्रपटाला ह्या अर्थाने कथा अशी नसतेच. बर्गमन तपशील, प्रतिमा ह्यांना जेवढे प्राधान्य देतो तेवढेच वाटल्यास अधिकच तो संगीताला देतो. बर्गमनच्या चित्रपटात संगीत फारच महत्त्वाची कामगिरी करते. आपल्या सत्यजित रे ची बर्गमनशी नेहमीच तुलना केली जाते. कारण दोघात अनेक गोष्टींचे साम्य आढळते. विशेषत: दोघांनाही तपशीलाच वेड. तसेच दोघेही संगीताला चित्रपटात फार महत्त्व देतात.

आणि म्हणूनच 'टच' हा बर्गमनचा पहिलाच इंग्रजी भाषेतील चित्रपट बघताना हा चित्रपट खऱ्या अर्थाने बर्गमनचा वाटला नाही. 'टच' बघताना बर्गमनने ह्या चित्रपटात आपला आत्मा ओतला नाही तर केवळ दुरूनच स्पर्श केला आहे, असे वाटले. चित्रपटातील अनेक तपशीलवार दृश्यातून आणि अनेक प्रतिमांतून बर्गमन 'टच' आढळला. पण हा चित्रपट पाहून प्रेक्षक अस्वस्थ होत नाही की भारावूनही जात नाही. हा कोरडेपणा म्हणजे बर्गमनचा 'टच' कुठेतरी फसला आहे ह्याचीच ग्वाही आहे. 'टच' पाहताना आपण कुठेतरी जीवनानुभूतीच्या भयंकर अशा खोल दरीत कोसळत आहोत किंवा झपाटणाऱ्या अशा वादळी व्यक्तीमत्वाने भरकटत जात आहोत असे कुठेच वाटत नाही. बर्गमनच्या ह्या अपयशाला कारण कोण असेल तर त्याच्या स्वतंत्र प्रतिभेला पडलेले पटकथेचे बंधन असावे.

कथा तशी वेगळी नाही. पंधरा वर्षे सुखाने आपल्या नवऱ्याबरोबर संसार करणाऱ्या एका आदर्श गृहिणीची ही कथा. ही गुण सुंदरी खरोखरच आपला घरसंसार मनापासून करीत असते. दोन गोजीरवाणी मुलेही असतात. अगदी पहाटेपासून रात्र होईपर्यंत झपाटयाने साऱ्या कामाचा उरक करणारी कॅरीन आपल्या मुलांवर, नवऱ्यावर मनापासून प्रेम करीत असते. आपण अत्यंत सुखी आहोत ह्याच एका गोड जाणीवेने बेसावध असतानाचा डेव्हीड नावाचा पुरुष तिच्या आयुष्यात वादळासारखा येतो आणि तिला अक्षरश: बेभान करून निघून जातो.

चित्रपटाच्या सुरुवातीलाच तिच्या आईचा मृत्यू दाखविला आहे. हा प्रसंग चांगला घेतला असला तरी ह्या 'शॉटची' काय गरज होती ? डेव्हीडची भेट कुठेही दाखविता आली असती. बहुतेक हा शॉट आपल्या जीवनातून कोणीतरी गेले की उसासून रडणाऱ्या कॅरीनचा स्वभाव दाखविण्यासाठी घेतली असेल असे वाटते. कारण डेव्हीड नकार देतो तेव्हा नी जातो तेव्हाही ती उसासून रडते. आपले व डेव्हीडचे संबंध आपल्या नवऱ्याला कळल्यावर म्हणजे गुपीत गेल्यावरही ती अशीच रडते. अर्थात कॅरीनचे काम करणारी बीबी अँडरसन अगदी मनापासून रडते. अगदी हमसाहमशी. तिचं रडू ग्लिसरीनचे वाटत नाही. अगदी लहान मुलासारखे हुंदके देऊन रडणाऱ्या बीबी अंडरसनला आपण मानले पाहिजे. अर्थात तिचे हे रडणेच काय तिचा साराच अभिनय अगदी सहज व जिवंत वाटतो. आपल्या आईचं प्रेत पाहून तिला रडू फुटलं नाही परंतु तिच्या वस्तु पाहून मात्र ती हमसाहमशी रडते हे अर्थात बर्गमनच दाखवू शकतो. इथेच डेव्हीड तिला प्रथम पाहतो आणि प्रेमात पडतो. योगायोगाने तोच डेव्हीड तिच्या नवऱ्याचा मित्र म्हणून घरी येतो. त्याचा स्वभाव थोडा चाकोरीबाहेरचा, असुसंस्कृत म्हटले तरी चालेल. आल्या आल्या लगेच तो कॅरीनला सांगतो, हॉस्पिटलमध्ये तू रडत होतीस तेव्हा माझं तुझ्यावर प्रेम बसले. इथे कॅरीनच्या संथ जीवनात डोहात दगड पडावा तसे होते आणि लहान लहरी निर्माण होतात. पुढे हा डेव्हीड त्या सुखी जोडप्याच्या संसाराचा 'आल्बम्' बघताना बेधडक बोलतो. 'तुझ्या बायकोचे नग्नचित्र आहे का ?' इथे कॅरीन व तिचा नवरा थोडे हादरतातच. आलेला पाहुणा जातो पण कॅरीनच्या मनाची दारे उघडून जातो. नवरा हॉस्पिटलमध्ये गेला की ही त्याच्याकडे जाते. सुरुवातीला दोघेही गोंधळतात. कॅरीन का कुणास ठाऊक त्याच्यावर आसक्त होते. ती त्याला सांगतेही की मी तुझ्याकडे का आले हे मला माहित नाही. आणि तुझ्याशी शय्यासोबत का करतेय हेही मला कळत नाही. परंतु काहीतरी घडलय आणि माझं शरीरच तुझ्याकडे ओढ घेतय. इथूनच कॅरीन आणि डेव्हिडच्या आसक्त प्रेमाला सुरुवात होते. जगाच्या भाषेत खर म्हणजे हा शुद्ध व्यभिचार असतो. पण कॅरीनच्या मनीही व्यभिचार नसतो. जीवनात काहीतरी हरवल्याचा आणि गवसल्याचा एक अगम्य आणि अपूर्व असा अनुभव असतो. वाटल्यास त्याला तुम्ही प्रेम म्हणा किंवा डेव्हीडचा शरीर 'स्पर्श' म्हणा.

कॅरीन–डेव्हीड जसजसे अधिक जवळ

येतात तसतसे त्यांच्या ह्या प्रेम संबंधाला अधिकच धार येते. त्यातूनही डेव्हीडच्या तऱ्हेवाईकपणामुळे कॅरीनला केवळ त्याच्यासाठी रात्रीअपरात्री केव्हाही जावे लागते. फोनवरून तू मला आताच पाहिजेस म्हटल्याबरोबर तिला नकार देणे कठीणच होऊन जाते. बरं त्याचे प्रेमही तऱ्हेवाईक. अगदी जनावरासारखे. त्यामुळे तिला तो मारझोडही करतो. पण त्याच्यासाठी ती सारं सहन करते. हा तिच्यावर पिसाटासारखा प्रेम करतो. त्याची ही तऱ्हा बघून हा आपल्याला सोडून जाईल काय अशी शकाही तिला येते. परतु तिला आता कळून चुकलेले असते की ती एक क्षणही त्याच्यावाचून राहू शकत नाही. त्यात तिच्या नवऱ्याबरोबर तिला बाहेरगावी जावे लागते. मग काय चोरून प्रेमपत्रे सुरू होतात. त्या प्रेमपत्रातून दोघेही एकमेकाच्या स्पर्शासाठी त्याच्याकडे कधी जाऊ असे तिला होते. ह्या चोरट्या सवधाचा तिच्या नवऱ्याला सुगावा लागतो. आणि एक दिवस कॅरीन डेव्हीडबरोबर झोपलेली असतानाच तिचा नवरा तिथे येतो. डेव्हिड काय सांगायचं ते सांगतो. डेव्हीडचे त्यावर काहीच म्हणणे नसते. पण तिला कळल्यावर ती हमसाहमशी रडते. तिचा नवरा तिला धीर देतो. एकीकडे समजस नवरा तर दुसरीकडे डेव्हीड ह्या सघर्षात तिला काहीच उमगत नाही. एक दिवस डेव्हीडच तिला न विचारता लंडनला निघून जातो. कॅरीन नवऱ्याला विचारून त्याच्यासाठी लडनला जाते. फक्त एकदाच परवानगी मागून जाते. लंडनला डेव्हीड बहिणीबरोबर राहतो. त्याची भेट होत नाही. एकदर प्रकार कळून ती परत येते. ती गरोदर असते. घरी आल्यावरही ती त्याच्यासाठी तळमळत असते. आणि पुन्हा डेव्हीड तिच्याकडे येतो. परंतु ती त्याला निक्षून सागते, माझं कर्तव्य मला केलं पाहिजे. आपलं 'प्रकरण' आता सपल. डेव्हीड तिला न विचारता का गेलो ते सांगतो. 'तुझ्या शिवाय राहाणं अशक्य आहे हे कळल्यावर मी परत आलोय.' परतु कॅरीनचा निश्चय बदलत नाही. आणि तू खोटी आहेस, तू खोटे बोलते आहेस असे वैतागून बोलत डेव्हीड तिचा निरोप घेतो.

बर्गमनने ही कथा आपल्या नेहमीच्या वैशिष्ट्याने म्हणजे तपशीलाने मांडली आहे. कॅरीन हॉस्पिटल मध्ये आईला बघताना बाहेरील रस्त्यावरील वर्दळीचाही कर्कश आवाज दाखविला आहे. (ह्या आवाजामुळे आतील पेशंटची काय अवस्था होत असेल?) मात्र शेवटी वियोगाच्या वेळी कावळ्याच्या आवाजाचा योग्य वापर केला आहे. कथेच्या एकदर बांधणीत व ती पडद्यावर सादर करताना बर्गमनने चर्चचा फारच चांगला वापर केला असून चर्चमधील मेरीची प्रतिमा तसेच त्यामूर्तीतच एका किड्याने घातलेली अंडी दाखविणे व चर्चच्या भिंतीवरील सर्पाकृती ह्यांचा उपयोग बर्गमनने अचूक केल्याने कथेला गूढ अशी उंची लाभली आहे. परतु ही प्रेमकथा त्या मानाने उत्कट वाटत नाही. त्याचे कारण आपल्याला कॅरीन आणि डेव्हीडच्या स्वभावातच सापडते. कॅरीनच्या शिवाय तो राहूच शकत नाही हे कुठेच एस्टॅब्लिश होत नाही. तीच गत कॅरीनचीही होते. पहिल्याच भेटीत प्रेम व्यक्त करणारा आणि कॅरीनच्या नवऱ्याला तिचं नग्नचित्र दाखव म्हणणारा धाडसी डेव्हीड तिचा नवरा जाब विचारतो तेव्हा काहीच बोलत नाही. निर्भयपणे ती आत आहे हे सांगत नाही किंवा तिच्याशिवाय मी जगू शकत नाही हेही सांगत नाही. तसेच जी कॅरीन त्याच्याशिवाय जगू शकत नाही ती शेवटी कर्तव्याच्या गोष्टी कशा करते? इथे आपल्याला हॅलो! गुडबाय! ह्या चित्रपटाची आठवण येते. हॅलो! गुडबाय मधला प्रियकर तिच्या नवऱ्याच्या तोंडावर ठणकावून सागतो. त्याच्या प्रेमात उत्कटता आढळते म्हणून त्या चित्रपटाचा शेवटही अस्वस्थ करतो. उलट 'टच'मध्ये मात्र शरिराच्या आसक्तीने झपाटलेली माणसे पराभूत होताना पाहावी लागतात.

बीबी अडरसनचे कॅरीनचे काम लाजवाब आहे. बीबी साठी हा चित्रपट अवश्य बघावा. एक गृहिणी आणि प्रेमाने झपाटलेली बाई तिने मोठ्या ताकदीनें उभ्या केल्या आहेत. तिचं रडणं तर चांगलंच लक्षात राहातं. डेव्हीडचे काम एलिएट गोल्ड ह्या नटाने मन लावून केले आहे त्याची दाढी हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग असतो. परंतु मध्येच त्याचा गुळगुळीत चेहरा एकदम शामळू वाटतो. सुरुवातीस तिच्या घरी तो पाहुणा येतो तेव्हाच बोलणं कॉमिटरीसारखं वाटतं. ह्या चित्रपटातील संवाद ऐकावे असेच आहेत. कॅमेऱ्याने टिपलेली निसर्गदृश्ये डोळ्यांना सुखावतात.

एकदरीत हा चित्रपट मनाचं समाधान करीत नाही. इगमार बर्गमनचा आहे म्हणून मी तरी आत्मवचना करून ती ग्रेट मानणार नाही. मात्र बीबी अडरसन ही नटी ग्रेट आहे. निदान तिच्या अभिनयाठी तरी 'टच' हा चित्रपट जरूर बघावा. अगदी मस्त. □ □


फुकट, फुकट, फुकट,

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पांढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॉकेट औषध फुकट मागऊन फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**


## दुरुस्ती

८ जून '१९७४' माणूस अकात दर्डी-सबधीच्या "चौकशीची न्यारी तऱ्हा" या लेखात पृष्ठ २५ वर चौकशी अधिकारी श्री. बारई 'नवे जग' या दर्डीच्या नियतकालिकांच्या 'संचालक' मंडळावर होते असा उल्लेख आलेला आहे. "संचालक" या शब्दाऐवजी "सपादक" हा शब्द हवा होता.

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. १५ जून ७४ ते २१ जून ७४**

## राष्ट्रपती निवडणुकीच्या जोरदार हालचाली

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या संघर्षाच्या वातावरणातच खऱ्या अर्थाने चमकतात हे अनुभवाने सिद्ध झाले आहे. त्यांच्या कर्क राशीला राजकीय वृत्तीचा रवी हा ग्रह जरी प्रतिकूल असला तरी लग्नी स्थानापन्न झालेला मंगळ या वेळी त्यांच्या कडून अशी काही पावले टाकवील की त्यांचे अनुयायी, विरोधक व टीकाकारही आश्चर्याने तोंडात बोटे घालतील. अर्थातच हा निर्णय राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसंबंधात असेल. महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदाच्या नावाची देखील चर्चा सुरू होईल. बिहार विधान सभेला जास्तच घरघर लागेल.

### मेष : अडचणी संपतील

आठवड्याच्या सुरुवातीस चंद्र तेवढा चांगला नाही. तरी पण इतर ग्रहांचे भरपूर सहकार्य तुम्हाला आहे. त्यामुळे हा आठवडा प्रगतीच्या बाबतीत काही नवनवीन निर्णय देऊन जाईल. बुधवार ते शुक्रवार हे दिवस अधिक प्रगतीचे आहेत. जमीन, कर्ज यासंबंधीचे करार याच वेळी करा. शनिवार ते सोमवार नोकरीत खूप काम करावे लागेल. वरिष्ठाकडे तक्रार करून त्याचा फारसा उपयोग होणार नाही. भलत्या महत्वाकांक्षा मनात बाळगू नका. आर्थिक बाबतीत फक्त गरज भागेल. **महिलांस** : नोकरीत सहकारी महिलाबरोबर स्पर्धा करू नका. स्वतःचे डोके चालवून मनःस्थिती बिघडवून घेऊ नका.

### वृषभ : सावध रहावे

या आठवड्यात तुम्हाला अंतरिक्षातील काही मोठे ग्रह तेवढेसे प्रतिकूल नसले तरी ते तुमची कसोटी पहाणार आहेत. ग्रहांच्या कसोटीला उतरलात तर यश तुमचे आहे. प्रामुख्याने राजकारणाच्या क्षेत्रात अतिशय सावध रहावे. विरोधक, गुप्त शत्रू, वरिष्ठ नेते उगीचच त्रास देण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या लोकप्रियतेलादेखील ग्रहण लागण्याची शक्यता आहे. नोकरी धंद्याची परिस्थिती एकंदरीत ठीक राहील. आश्वासने कुणाला देऊ नयेत. नोकरीत तडजोडीने वागा. भांडणाचा प्रसंग शक्यतो टाळा. पगार वाढीचा अर्ज करू नका. **महिलांस** : तुमच्या वागण्याचा अर्थ लोक भलताच करतील- तेव्हा आपले आचरण व वागणे व्यवस्थित ठेवावे.

### मिथून : महत्त्वाचा सप्ताह

चंद्र उत्तम आहे तर रवी व मंगळ प्रतिकूल नाहीत. तरीपण सध्या शनी राशीवरच असल्यामुळे तुम्ही कोणतेही महत्त्वाचे बेत आखा ते यश देऊनच जातील. नोकरीत झगडूनच तुम्हाला तुमचे वरिष्ठ स्थान मिळवावे लागेल व त्यात शेवटी यश येईल. विनाकारण लांबणीवर पडलेली नव्या नोकरीची ऑर्डर यावेळी अचानक हाती येईल. आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मात्र अजून काही काळ तरी थांबावे लागेल. अचानक पैसे मिळवण्याच्या नादी सध्यातरी न लागणे शहाणपणाचे ठरेल. सोमवार ते गुरूवार महत्त्वाच्या घटना उद्योग व्यवसायात घडतील. दूरच्या प्रवासाचा बेत ठरेल. **महिलांस** : हाती घेतलेल्या कामात यश येईल. निंदेकडे दुर्लक्ष करा.

### कर्क : खर्च मर्यादित ठेवा

आपणास केतू अकरावा आहे हीच काय ती त्यातल्या जमेची बाजू होय. बाकी अनेक मोठे ग्रह तुमची कसोटी पहाणार आहेत. त्रास, अडचणी, दिरंगाई, अवमान, माघार असे काही तरी आठवडाभर घडत राहाणार आहे. मन उदास अगर निराश व्हावे असे काही घडणार नाही किंवा हे ग्रह तुमचे काही विशेष नुकसान करतील असेही नाही. पण बेसावध राहून चालणार नाही एवढेच तात्पर्य होय. बारावा शनी हाती पैसा टिकू देणार नाही व पैसा मिळविण्यासाठी हातून नको ते घडण्याचीही शक्यता असते. एवढे पथ्य पाळलेत तर बाकी काहीं विशेष नाही. नोकरी उद्योगाची परिस्थिती 'जैसे थे' राहील. आजाराची मनात भीती वाटत असली तरी भिण्याचे कारण नाही. **महिलांस** : नव्या साड्या अगर नवे दागिने घेण्याचे तूर्त टाळा. आहे तो पैसा मात्र जपून वापरा.

### सिंह : राजकीय स्थित्यंतर

तुमच्या राशीवर कुंभेतील गुरुची असलेली दृष्टी तुम्हाला अध्यात्म क्षेत्राकडे खेचून नेण्याचा प्रयत्न करणार आहे. पण तुम्ही मात्र त्या क्षेत्रात गुंतणार नाही हे उघड आहे. मिथून शनीबरोबर असलेला रवी व व्ययस्थ कर्केतील काहीसा चंचल मंगळ तुम्हाला तसे करूच देणार नाही. मात्र धर्म व अध्यात्म क्षेत्रातील एखादी मोठी व्यक्ती तुम्हाला शुभाशीर्वाद दिल्याखेरीज राहाणार नाही. तसा प्रबळ योग या सप्ताहात आहे. राजकारणात मोठे स्थित्यंतर संभवते. पक्षांतर करण्याची वृत्ती जोर करील व त्यामुळे तुमची उपेक्षाही संपेल. नोकरी नसल्यास मिळेल. विज्ञान वा मेडिकल पदवीधरांना उत्तम संधी. चालू नोकरीत थोडे समाधानाचे वातावरण राहील. पैसा पुरणार नाही.

महिलांस मागे केलेल्या परिश्रमाचे चीज आता होईल. पैसे जपून खर्च करा.

**तूळ : धाडस नको**

चंद्र-गुरुचा व हर्शल गुरुचा नवपंचम योग तुमच्या तूळ या राशीतून व पंचमस्थानी असलेल्या कुंभ राशीतून सध्या चालू आहे ही अद्वितीय भाग्याचीच बाजू आहे. तरीपण सुखातही काही वेळा मिठाचा खारटपणा येऊ शकतो. बुध व रवी हे ग्रह या आठवड्यात तुम्हाला एवढे अनुकूल नाहीत. त्यामुळे कोणत्याच क्षेत्रात धाडसाची पावले टाकू नका. रविवार ते बुधवार या दिवशी कोणत्याही आर्थिक क्षेत्रात शेअर खरेदी करू नका. तसे करारही करू नका सौंदर्यप्रसाधने व उंची कापड यांच्या आर्डर्स जपून द्या. **महिलांस** . नोकरीत फारसा त्रास नाही. पण वरिष्ठाच्या डोळ्यावर येईल असे उद्योग करू नका.

**वृश्चिक : खर्चिक उद्योग टाळा**

स्वतंत्र उद्योग तुमच्या जीवनात फारसे धार्जिणे नाहीत. नोकरी हाच तुमचा खरा व्यवसाय व त्यातच तुम्हाला प्रगतीची नवी क्षितीजे उपलब्ध होतात. ज्याला शासकीय कर्तृत्व म्हणता येईल ते तुमच्या अंगी भरपूर प्रमाणात असते. या आठवड्यात मात्र एखादा दुसरा व्यापारी धंदा तुम्हाला भुरळ घालील. हा मोह जर तुम्ही टाळला तर भावी काळात त्याचे अनुकूल परिणाम तुम्हाला दिसतील. हा आठवडा तसा अनुकूल आहे. सोमवार ते गुरुवार या मुदतीत नोकरी, शेती, खाणउद्योग व अ‍ॅल्यूमिनियम याच्या संबधीच्या अनेक योजना तुमच्या दृष्टिपथात येतील. **महिलांस** : मुलाचे कौतुक करण्याचा योग येईल. हाती पैसा खेळेल.

**धनू : मन भीतीग्रस्त राहील**

बारावा राहू सातवा शनी हे ग्रह काही तुम्हाला सुखाने चार घास खाऊ देणार नाहीत. मंगळ आठवा आहे तर केतू सहावा आहे. हे ग्रहदेखील अनुकूल आहेत असे कोणीच म्हणणार नाही. तरी पण सावधपणा, खाणेपिणे मर्यादित उन्हाळा व थंडी यापासून योग्य सरक्षण या पद्धतीने वागलात तर या प्रतिकूलतेतही तुम्ही निभावून जाल. रक्तदाब, गॅस्ट्रिक ट्रबल, मानसिक कमकुवतपणा या आजाराचा ज्याच्या ठिकाणी प्रादुर्भाव तसेल त्याचे मन भीतीग्रस्त राहील. पण काळजी करावी असे मात्र काही नाही. दैनंदिन कार्यक्रम सुरळीत चालू राहातील **महिलांस** थरथरणे, हातापायाला मुंग्या येणे असे काही तरी जाणवेल. पण ते तात्पुरतेच ठरेल.

**मकर : संताप आवरा**

दुसरा गुरू जरी तुम्हाला तेवढासा वाईट नसला तरी त्याचा तुम्हाला फारसा उपयोग देखील होण्यासारखा नाही. सातव्या मंगळाचे उग्र रूप व मिथुनस्थ रवी-शनीचा दहशतवाद यातूनच तुम्हाला यावेळी मार्ग काढायला हवा. घरात काही ना काही नवरा-बायकोची कुरबूर चालूच राहील. उत्तरे प्रत्युत्तरे होतील त्यामुळे शांततेच्या व स्वास्थ्याच्या वातावरणास गालबोट लागते की काय असेही वाटू लागेल. पैसा मिळणार नाही असे नाही. पण नको तसा पैसा हातून खर्च होईल. नोकरी करणाऱ्यानी रविवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी थोडी काळजी घ्यावी. **महिलांस** · मुले स्वैर वागून काळजी लावतील तर पतीराजाकडून बोलणी खावी लागतील.

**कुंभ : आकांक्षा बहरतील**

तुम्हाला चंद्र शुभ असताना या आठवड्याची सुरुवात होत आहे. सहावा मंगळ विरोध मोडून काढील तर मिथुनेचा रवीशनी तुमच्या राजकीय महत्त्वाकांक्षा साकार करील. राजकारणात तुम्ही जर सत्ताधारी पक्षात असाल तर यावेळी अत्यंत महत्त्वपूर्ण असे पद – त्या पदाचा तुरा तुमच्या डोक्यावर खोवला जाईल याबद्दल शंकाच नको. नोकरीत बढती-बदलीचा योग आहे, तर औद्योगिक क्षेत्रात एखादे अत्युच्च स्थान तुम्हाला मिळेल. आर्थिक परिस्थिती तर इतकी छान राहील की तुम्ही श्रीमंत गणले जाल. मात्र स्वत:ला तुम्ही श्रीमंत समजू नका. सोमवार-मंगळवार शुभ दिवस आहेत. **महिलांस** : कुमारिकाचे विवाह चटकन जुळतील. मन प्रसन्न राहील.

**मीन : प्रवास योग**

रवी-शनी यासारख्या जबरदस्त ग्रहानी तुमचे सुखस्थान मरगळून टाकले आहे तर बाराव्या गुरूने तुमचा संयम व आर्थिक बाजू दुबळी करून टाकली आहे. पण गुरू हा तुमचा राशीस्वामी आहे व तुमचा स्वभावही तसा विवेकी आहे. त्यामुळे या प्रतिकूल ग्रहस्थितीवर तुम्ही मात करालच. असे असले तरी मंगळासारखा ग्रह तुम्हाला बलवत्तर असल्यामुळे नोकरीच्या निमित्ताने या आठवड्यात परदेशी प्रवास घडण्याची शक्यता आहे. पैशाची गरज भागेल कौटुंबिक सुख उत्तम आहे. **महिलांस** · सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा लाभेल. नोकरीत थोडे स्थित्यंतर – स्थलांतर घडेल. परीक्षेत यश.

□ □


शनवारवाड्यातील शमादान


ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

# चकनाचूर

भाऊ पाध्ये



## विनोद खन्ना बिलकुल सीधा साधा आदमी

‘ रेल्वे संपाचा चित्रपट धंद्यावर परिणाम ’ एका फिल्मी नियतकालिकावरील मथळा. मी चमकलो. फिल्मी लोक एरव्ही विमानाने आणि अलिशान मोटारीने प्रवास करणारे. रेल्वे सुरू नव्हती म्हणून त्यांच्यावर काय परिणाम झाला बुवा. एकूण अखबारवाल्यांना काही तरी विषय पिंजायला हवा, हेच खरे.

मात्र रेल्वे संपाचा माझ्यावर परिणाम झाला. जुहूच्या माझ्या पाटर्या बुडू लागल्या. प्रवास।चा इंतजाम असला तरच मी पार्टीला हजर असायचा.

हॉटेल होरायझनमधल्या एका पार्टीत विनोद खन्ना भेटला, शूटिंग मेकप झाले होते नी आता शराब घ्यायला तो मोकळा होता. आमच्या इन्या गिन्या चार अखबार वाल्यामध्ये येऊन आमची तो खबर घेऊ लागला म्हणजे खरोखरच अखबार वाल्याची ‘ इम्तेहान ’ सुरू केली. आम्हाला ती आवडली नाही. पण त्याला त्याविषयी चर्चेची खाज आली होती.

‘ तुम्ही चांगला अभिनय आणि वाईट अभिनय कशावरून ठरवता ?’ त्याने एक

प्रश्न विचारला.
' सिन्सीरिटीवरून. तुमच्यासारखे सिन्सीअर अदाकार पडद्यावरून आपली सिन्सीरिटी प्रेक्षकावर असर घडवून आणते. '
विनोद पुढे काही बोलला नाही. मी ' इम्तेहान ' पास झालो होतो का ?
हिंदी पिक्चरमध्ये जी हातावर मोजण्याइतकी सिन्सिअर मडळी आहेत, प्राण, सचिन देव बर्मन, वहिदा, विजय आनद, त्यात विनोद खन्ना आहे. मजा अशी की विनोद एरव्ही हिरोच्या भूमिका करत असूनही आणि चागल्या करत असूनही त्याला कोणी चागला अदाकार म्हणून हिशेबात धरत नाहीत. हा माणूस सिन्सिअर आहे, हाच त्याचा अपराध असावा. एखाद्या बिघडलेल्या जगामध्ये एखाद्या गुणी माणसाने पाऊल टाकले म्हणजे त्या जगातील माणसाने म्हणावे, ' का रे बाबा तू आमची दुनिया बिघडवायला आलास ?' तसेच ही मडळी विनोद विषयी म्हणत असतील. ह्या माणसाने ' मेरा गाव मेरा देश ' मध्ये धर्मेंद्रच्या हातून पट्टयाचा मार खाल्लाय. ' कच्चे धागे ' मध्ये घोडयावर बसण्यासाठी कधी डमी वापरला नाही. शिवाय त्याची लफडी नाहीत. त्याची अदाकारी आणि त्याची बायका-मुले यांची कधी गल्लत नाही. विनोद एकदम सीधा साधा आदमी. तो क्रिकेट वेडा आहे. पण त्याच्या क्रिकेट प्रेमाविषयी असे सांगतात की तो क्रिकेट सामना पहायला बसला की कुणालाही लक्षात येणार नाही असा येऊन बसेल आणि कुणाच्याही लक्षात येणार नाही अशा रितीने निघून जाईल. क्रिकेट बघायला गेला तरी तिथेही हा माणूस सिन्सिअर वागतो. तो क्रिकेटही चांगला खेळतो म्हणजे.
सिन्सिरिटीमुळे विनोदखन्नाकडे काही सिन्सिअर निर्मात्यांचे लक्ष गेले आहे. एन. सी. सिप्पी—गुलझार, राजखोसला, आत्माराम व दिग्दर्शक पद्मनाभ. एरव्ही आता चित्रपट धद्यामध्ये आपण काही न्यू वेव्ह चित्रपट काढत नाही. आपल्या फक्त पब्लिकचे दिल बहलावायचे आहे, आणि पैसा कमवायचा आहे, असे सागणारे सिनेमावाले फार झाल्यामुळे विनोद खन्ना हा मोजक्याच निर्मात्यांना पसत पडणार. तो शशी कपूर किंवा धर्मेंद्र होऊ शकणार नाही.
अदाकाराचे अर्धे यश भूमिकेला तो साजण्यात आहे. विनोद खन्ना या अदाकारीच्या इम्तेहानमध्ये नेहमी पास होत आला आहे. उच-निच बुलंद सीना, लबे हाथ आणि निमुळती कमर अशी याच्या तब्येतीची खुबसुरत मर्दानकी त्याच्या पेहेरावातूनही डोकावते. बर्ट लँकेस्टर, मार्पन ब्रँडो, ली व्हॅन क्लिफ असे जे थोडे ॲक्टर्स उघडे झाले तरी पहावेसे वाटतात, त्यात विनोदही आहे. ' मस्ताना, ' सच्चा-झूटा 'मध्ये तो पोलीस अफसर म्हणून नीटपणे उभा राहिला. वाटले याने नेहमी असेच लो-की ' मध्ये बोलणाऱ्या पोलीस अफसराचे काम करावे. ' मेरा गाव मेरा देश', कच्चे धागे मध्ये हा बेडर डाकू म्हणून उभा राहिला. खरोखर डाकू म्हणून काम करावे ते विनोद खन्नानेच असे त्यावेळी वाटले. ' मेरे अपन ' मध्ये तो बगावत करणारा विद्यार्थी म्हणून पेश झाला. अजूनही या माणसाचे वय बगावत करण्याचे आहे, इतके वाटले. ' अचानक ' मध्ये एक बायकोवर प्रेम करणारा हुंडेलहप्पी सैनिक वाटला. एका खदारामध्ये ठाण माडून, दुष्मनाना तोड देतानाही तो अस्सल वाटला. आता ' इम्तेहान 'मध्ये आदर्श शिक्षकाच्या इम्तेहानमध्येही तो कामयाब झाला. चष्मा लावणारे इतर अदाकार बकवास दिसतात परतु ' इम्तेहान 'मध्ये विनोद किती हँडसम दिसतो, त्याची उची, त्याच्या चेहेऱ्यावरील सिन्सिरिटी यामुळे आदर्श शिक्षकाची रोमँटिक भूमिका, तो प्रेक्षकाच्या गळीच उतरवतो.
आणि विनोदविषयी एक गोष्ट ऐकली ती मला इतर सर्व अदाकारांपेक्षा ग्रेट वाटली. एका अखबारवाल्याने विचारले, ' तुम्ही ' लास्ट टँगो 'मध्ये काम कराल काय ?' (अर्थात तुमच्या मनाची तयारी आहे काय ? ) विनोद तयार झाला.
दुसरे सारे अदाकार ' लास्ट टँगो 'चे नाव घेताच नाक मुरडतात आणि तरीसुद्धा फिल्म इंडस्ट्रीत इटलेक्चुअल म्हणून फिरत असतात. ¤

# महाराष्ट्रात सत्यजित

महाराष्ट्राच्या अस्मितेने दिवसेंदिवस घमेंड-खोरीचे स्वरूप धारण केले आहे, असे मला वाटू लागले आहे. महाराष्ट्राला लोकमान्य टिळकांचा अभिमान होता, म्हणून त्यांनी महात्मा गाधी ॲक्सेप्ट केले नाहीत, यशवंतरावाइतका दुसरा ' यशवत ' दिसला नाही, म्हणून त्याने डॉ. लोहिया ' ॲक्सेप्ट ' केले नाहीत. परतु जुने मराठी सिनेमे ग्रेट होते म्हणून ' सत्यजित 'ना ॲक्सेप्ट करायचे नाही, हा काय प्रकार आहे, तो आपल्याला समजलेला नाही. या खुजाच्या देशामध्ये सत्यजित हा एकच उच माणूस आहे, हे निर्विवाद. त्याने आंतर राष्ट्रीय पारितोषिके मिळविलीत की काय, याचा प्रश्न नाही. हवी तर ती आमच्या राजा परांजपे, ग. दि. मा. किंवा शरद तळवलकर यांना मिळावीत, त्यामुळे त्यांच्यामध्ये काही फरक पडणार नाही. पण, सत्यजित हा एक प्रयोगशील आणि नवा विचार करणारा माणूस आहे, म्हणून त्याचे मोल आहे. आणि या देशात विचार कोण करतो ? (विचार करत असता तर देशाची ही परिस्थिती आली असती का ? )
तर असा सत्यजित महाराष्ट्रात आला. महाराष्ट्र शासनाने त्याला मराठी चित्रपटातील पारितोषिक-विजेत्यांना पारितोषिके देण्यासाठी आपले शुभहस्त वापरण्याची विनंती केली होती. शासन एरव्हीच कुणाला ना कुणाला बोलवत असतेच पारितोषिकं देण्यासाठी. लोकांना पारितोषिके द्यावीत आणि आपण पगारभत्ते खावेत हा शासनाचा उद्योग असतो. पण, शासनाने ' सत्यजित 'ला बोलावले हे चांगले झाले. ' सत्यजित ' येणार म्हणूनच मी त्या कार्यक्रमास हजर राहिलो. काही नाहीतरी सत्यजितचा आवाजच इतका घनगभीर आणि अथांग आहे की तो कानावर पडला की आपण भारावून जातो.
' सत्यजित ' हा बहुतेक बगाली फिल्मी सेनेचा सेनाप्रमुख आहे, असे समजून आमचे ग. दि. मा म्हणाले, ' सत्यजित आमचा

सावकारी पाश, तुमच्या 'पाथेर पांचाली 'पेक्षा कमी नाही हो ' आमचे शरद तळवलकर म्हणाले, ' आमच्या मराठी सिनेमातल्या घरात शिरा. वातावरण अगदी मऱ्हाठमोळ !' नशीब. त्यात शांतारामबापू नव्हते. नाहीतर ते म्हणाले असते, ' तुम्ही आम्हाला डिसीका नाहीतर गोदार्द यांच्या गोष्टी सांगू नका, आम्हाला राजाभाऊ परांजपेच हवेत.'

सत्यजितना मराठी कळत नव्हते हे एक त्यांचे भाग्य. दुसरे म्हणजे त्यांना सिनेमा आणि भाषिक सिनेमावर अत्यंत प्रेम आहे, ही त्यांची दुसरी चांगली गोष्ट. आमचे राजाभाऊ ठाकूर हिंदी चित्रपटात गेले पण सत्यजितच्या हिंदी लोक पाया पडत असताना गेले नाहीत. संवाद कळत नाहीत ते चित्र मी कसे दिग्दर्शित करू, अशी त्यांची सचोटी होती. सत्यजितने तीस पस्तीस मिनिटे भाषण केले पण मराठी सिनेमाशी फारसा परिचय नसतानाही मराठी सिनेमाविषयी खूप सांगून गेले. भाषिक चित्रपट अधिक कसदार असतात, ते मेले तर ती एक शोकांतिकाच ठरेल. आणि हिंदी चित्रपट सृष्टीचे सावटा खालून बाहेर निघण्यासाठी आपण शोध केला पाहिजे–' ते म्हणाले. त्यांचे बंगाली सिनेमावर प्रेम आहे. म्हणूनच ते म्हणाले. कारण हे मराठी लोक मराठी सिनेमावर प्रेम करतील अशी त्यांची आशा होती. पण, मराठी सिनेमावाले मराठी चित्रपटावर प्रेम करतील अशी आपल्याला आशा नाही. त्यांना हिंदी चित्रपटातल्या हिरो हिरोयनींच्या तोडीस तोड नट–नटया पाहिजेत, मारामाऱ्या पाहिजेत, काश्मीरला जाऊन शुटिंग करायचंय आणि दाराशी अँबॅसेडर व एक फ्लॅट पाहिजे. मराठी माणसाचे अंतरंग मी केव्हाच ओळखले आहे. मी एकदा एका बड्या पुढाऱ्याशी डॉ. लोहिया विषयी बोलत होतो. तर तो म्हणाला, ' काय तुझा तो लोहिया ? कलकत्त्यामध्ये भणंगासारखा फिरत असतो. कोणी बघत नाही त्याच्याकडे. ' असे हे मराठी लोक माणसाची पारख करतात. ते काय ऐकणार आहेत सत्यजितचं ?

### हेमाची डमी

' नया दिन नई रात'च्या पार्टीला एक दिवस जाण्याचा इंतजाम आला होता. पार्टीला जाण्याचा उत्साह, त्या पार्टीला जमलेल्या भलत्याच चेहऱ्यांकडे पाहून उतरला होता. ह्या माणसांचे सिनेमा व्यवसायाशी कसले देणे घेणे आहे असे वाटले.

हँडसम विनोद–बाह्यचित्रीकरणाच्या वेळी.





अचानक तिथे हिरव्या साडीतली एक अदाकारी आली. हेमा ? मी दचकलो. देवीने तिला आमच्या बैठकीमध्ये आणले. त्या अदाकाराचे नाव रीटा अंचन. फिल्म इन्स्टिटयूट वगैरे केलेले असावे. आदल्या दिवशी झालेल्या एका फिल्मी समारंभात तिने ' हेमा ' म्हणून बऱ्याच मंडळींना हूल दिली होती.

देवीने एक अफलातून आयडीया केली. संजीवच्या आणि हेमाच्या गाजलेल्या प्रेम प्रकरणाचा तिने सोक्ष मोक्ष करायचा ठरवला. एकूण हेमा एरव्हीच अत्यंत ' बिझी आर्टिस्ट ' असल्यामुळे तिची डमी म्हणून रीटाबरोबरच तिची ' पक्की बात ' करून टाकावी असे ती म्हणू लागली. संजीवला देवी आपली फिरकी ताणण्याच्या मुडमध्ये आहे, हे लक्षात आल्यामुळे तो तिच्या वासालाही उभा रहात नव्हता. तो पुढे काही बोलला नाही. मी ' इम्तेहान ' पास झालो होतो का ?

पुरुषाचे उघडे अंग पहावे असे जे बर्ट लँकेस्टर, मार्लन ब्रँडो, ली व्हॅन क्लिफ किंवा आपले कबीर बेदी आहेत ना, तसाच विनोद खन्नाही आहे.

मी सारखा रीटा कशी प्रतिसाद देते हे पहात होतो. ती थोडीफार नर्व्हस् असण्याचा संभव होताच.

दरम्यान दोन तीन पोरं तिला ' हेमा ' समजून स्वाक्षऱ्या घेण्यासाठी तिच्याजवळ आली. तीही मग मजेत आली. तिने ' हेमा ' म्हणून चक्क स्वाक्षऱ्या करून त्या पोरांना संजीवकडे स्वाक्षऱ्यासाठी पाठवलं. अगदी खळखळून हसता हसताच ती म्हणत होती, ' धिस इज टू मच ' मी म्हणालो ' शाब्बास ! '

अखेर फिल्मी छायाचित्रकारांनी सगळ्या आर्टिस्टांना गोळा करून ग्रुप फोटोला उभे केले. रीटाला संजीवजवळ उभे करण्यात आले नी संजीव आपला ग्लास आमच्या दिशेने उंच करत होता.

' व्हॉट ए व्हिक्टरी ! '

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**